

श्रीकांत कुलकर्णी

# सावलीतले क्षण

# सावलीतले क्षण

श्रीकांत कुलकर्णी

ई साहित्य प्रतिष्ठान

पुस्तकाचे नांव: सावलीतले क्षण (saawalitale kshan)

प्रकार : ललित

लेखक : श्रीकांत कुलकर्णी

पत्ता : 14, Maharashtra co op Hsg Soc., Pune satara Road,

Parvati, Pune

मो- : 9850035037

E Mail : shrikantkulkarni5557@gmail.com

Blog : shrikaant.blogspot.com

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान®

पत्ता : e Sahity Pratishthan, eleventh floor, G1102, eternity,

eastern express highway. Thane 400604

esahity@gmail.com

www.esahity.com

©esahity Pratishthan® 2014

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचना व्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठान यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.
- या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशांचे पुनर्मुद्रण किंवा नाटक, सिनेमा, सिरियल, स्टेज शो किंवा तत्सम रुपांतर किंवा भाषांतर करण्यासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे.

ई साहित्य प्रतिष्ठान ही कवी, लेखक व वाचकांनी मिळून चालवलेली चळवळ आहे. नवीन उदयोन्मुख लेखकांसाठी हे व्यासपीठ आहे, आणि खेडोपाडी व देशोदेशी पसरलेल्या मराठी वाचकांसाठी वाचनाचे साधन आहे. ई पुस्तके. आता स्मार्टफ़ोनवर डाऊनलोड करून किंवा अॅपद्वारे वाचता येतात. आपण या चळवळीचे भाग होऊ शकता. आपल्या ओळखीच्या लोकांचे ई मेल पत्ते पाठवा. त्यांनाही विनामूल्य ई पुस्तके पाठवू. नवीन वाचक आणि नवीन लेखकांचे या चळवळीत स्वागत आहे

अर्पणपत्रिका,

शंकराच्या मंदिरात भेटलेल्या

त्या अनामिक आणि अपरिचित स्त्रीस.

त्याचप्रमाणे  जिच्या सोबतीने ही सावली

अनुभवतोय आणि पुढेही अनुभवायची आहे

त्या माझ्या पत्नीस, मोहिनीस

सप्रेम अर्पण

# प्रस्तावना

आपण लिहावे असे अनेक दिवस वाटत होते. असे वाटत असे पर्यंत वयाची पन्नाशी सरली. एक दिवस गोंदवल्याला गेलो येताना सिद्धेश्वर कुरोली येथे शंकराचे मंदिर बघावयास गेलो तर त्यावेळी देवळात दैनंदिन दर्शनासाठी आलेल्या एका मध्यमवयीन खेडूत स्त्रीस शहरातून आलेल्या आमचे कौतुक वाटले. तिला आपल्या गावात आलेल्या पाव्हुण्यांना देवाची काहीतरी वेगळी गोष्ट दाखवायची होती. ती म्हणाली “आमचा देव बोलतो. त्याचा आवाज ऐकून जा.” तिने पुजाऱ्याला आम्हाला आवाज ऐकवायला फर्मावले. ५-१० मिनिटांच्या प्रयत्नातून त्या शंकराच्या पिंडीतून ओंकार शीळ ऐकू आली. हा नाद आम्ही कधीच ऐकला नव्हता. सुमधुर ध्वनी त्या गाभाऱ्यात घुमला पुनःपुन्हा घुमला. बाईला तो देवाचा स्वर्गीय आवाज आम्हाला ऐकावल्याचा आनंद झाला. मग माझ्या लक्षात आले. अशी कितीतरी माणसे जीवनाच्या रखरखीत रस्त्याने जाता जाता भेटलेल्या एखाद्या झाडाच्या सावली प्रमाणे आनंद देतात. आपण त्यांच्या विषयी आणि त्या अनुभवाविषयी लिहावे. सिद्धेश्वर कुरोलीची ती अनामिक आणि अपरिचित स्त्री या लिहिण्याचा प्रेरणा स्त्रोत बनून गेली. देवाच्या आवाजावर लिहिलेला पहिला लेख अनेक मित्रांना पाठवला, अनेकांनी लेख आवडल्याचे कळवले. मग सपाटाच लावला. अनेक मित्रांना हे लिहिलेले पाठवू लागलो, अजून लिहिण्यास उद्युक्त करणाऱ्या प्रतिक्रिया आल्या. गेल्या दिवाळीत मुलाने अमेरिकेची वारी घडवली, पुन्हा एक महिना सावलीत गेला. त्यावर ५ लेख लिहिले ते पण अनेकांना आवडले. ४ वर्षांपूर्वी गुगलवर ब्लॉगची चावी सापडली होतीच. आता ई-साहित्यकरांनी ईपुस्तकाची संकल्पना दिली. “सावलीतले क्षण” हे अशाच भेटलेल्या व्यक्तींचे आणि अनुभवांचे क्षण आहेत जे तुम्हाला पण सावली देतील.

श्रीकांत कुलकर्णी
shrikantkulkarni5557@gmail.com

# अनुक्रम

भाग एक _ अमेरिका एक चिंतन

अमेरिकन जेटलॅग

Stop and Go

America Tissue Culture

For Here or to go

Sharing America

भाग दोन _ सावलीतले सहप्रवासी

सुरत्राण मावशी

ऋषितुल्य तरुणी

मोठ्या दादिजी

सुरेश हुंदरे

श्रीकांत कुलकर्णी यांचे अधिक लिखाण वाचण्यासाठी भेट द्या :

shrikaant.blogspot.com

# अमेरिका : एक चिंतन

# अमेरिकन Jet-lag

शेवटी गड्या आपला गांव बरा असे म्हणत आमची स्वारी सपत्नीक रविवार दि. १७.११.२०१३ रोजी त्रिपुरी पौर्णिमेस भारतात टेकली. त्रिपुरी पौर्णिमा आता सर्व साधारण भारतीय हिंदूंच्याही लक्षात न राहणारा सण पण अमेरिकेतून आमच्या बरोबर आलेल्या एका बाईंनी लक्षात आणून दिला.

“अग बाई! आज त्रिपुरी पौर्णिमा आहे. गेल्यावर सुनेला देवळात दिवे लावायला सांगायचे आहेत. अहो आम्ही तिकडे गेल्यावर इकडे काय दिवे लावतात काय सांगू. कसले सण अन कसले काय ? पण मी आले की, सगळ आपल्यासारख करून घेते”.

त्या आणि त्यांचे पती ६ महिने त्या मुलाकडे राहून परत आले होते. ते दोघे म्हणे दरवर्षी सहा महिने या सुनेकडे आणि सहा महिने त्या सुनेकडे कडे राहतात. असे गेली ८-१० वर्षे अव्याहत चालू असून. या वेळी व्हिसा पुढील १० वर्षांसाठी एक्स्टेंड केलाय.

“तिथे आम्ही माझा गुरवार, यांचा शनिवार आवर्जून करतो. संकष्टी आणि एकादशी मात्र दोघेही करतो. मला मेलीला हल्ली जरा खिचडीचा त्रास होतो. पण तिथल्या नातवांना साबुदाण्याची खिचडी फार आवडते म्हणून करते झालं. हे मात्र संकष्टी काहीही न खाता करतात.”... बाई

“मग आपल्या तिथ्या कशा लक्षात राहतात” मी.

“दरवर्षी कालनिर्णय नेतो ना. आता तर मुलगा इंटरनेट बघून सांगतो.”

आपल्या तिथ्या चंद्रोदयाप्रमाणे बदलतात तर तिथे पंचांग त्या शहराप्रमाणे बनवावे लागेल वगैरे गणिती ज्ञानाची आवश्यक्यता त्यांना नव्हती त्यांच्या software क्षेत्रातील मुलाने एक कालनिर्णय दिल्याने त्याचे काम सोपे झाले होते.

“मग आता काय?”.. मी

“मी रिटायर झालोय इथेही आणि तिथेही तसं काही काम नसते. मी इथे आणि तिथेही  दुपारी ३ तास आणि रात्री नेहमी प्रमाणे झोपत असल्याने jet lagचा त्रास नाही. आपल्याला काय दोन्हीकडे सारखेच... पती.

“कुठून रिटायर झालात”...मी

“जनता सहकारी बँकेतून. झाली आता ११ वर्षे. प्रिमॅच्युअर घेतली. कामाचा फार त्रास व्हायला लागला मुलगा म्हणाला आता व्हा रिटायर.” ...पती. एकंदर पतीराजांचा कोणत्या प्रकारचा Lag आहे ते लक्षात आले. आणि पत्नीचा धार्मिक jetlag उतरता क्षणीच गेला आहे असे लक्षात आले.

इतर कोणत्याही देशात तुम्ही राहून आलात तर या Jet-lag विषयी फारसा गाजावाजा होत नाही. आपण आजवर ब्रिटन, जर्मनी, जपान, चीन, मिडल इस्ट, ऑस्ट्रेलिया इथून आलेले अनेक जण पहातो, पण यांच्या  jet-lag विषयी फार

बोललेच जात नाही, नव्हे या मंडळींना जर jet-lag असेल तरी ही मंडळी तो मुकाट्याने एकट्याने सहन करतात कोणी त्याची साधी दखल पण घेत नाही. अमेरिकेतून आलात की jet-lagचा तुम्हाला अनेक दिवस त्रास होतो आणि हा त्रास काही दिवस सुखावणारा असतो. (काही त्रास pleasure देणारे असतात अगदी तस्सा). येणारा जाणारा “काय कशी काय अमेरिका? सध्या jet-lagचा त्रास वगैरे काही ?” अशी सुखावणारी चौकशी करतो. एरवी खडूस असणारा बॉस तुमच्या jet-lag विषयी सिम्पथी दाखवतो. कारण आता तुम्ही अमेरिका returned झालेले असता. एरवी उशिरा येण्यासाठी कुरकुर करणारा बॉस, सकाळी ३-४ तास उशिरा येण्यास आणि सायंकाळी ३-४ तास आधी घरी जाण्यास परवानगी देतो. एकंदर तुमचा भाव वाढलेला असतो. अमेरिकेतल्या सुनेकडून ६ महिन्यांनी परत आलेल्या सासूबाई इथल्या सुनेकडे या नावाखाली पुढचे ८ दिवस यथेच्छ झोपून घेतात. जर एखादा इथला software engineer अमेरिकेत काम करून आला असेल तर विचारूच नका त्याचा jet-lag स्पेशल असतो. “त्याला ना दरवेळी jet-lagचा फार त्रास होतो.” यातील दरवेळीवर जोर देत त्याची आई आपल्या लेकाला मधून मधून भारतात देखील यावे लागते असे सुचवत मुलींची स्थळे चाचपत असते.

अमेरिकन jet-lag ची बाधा तेथून येणाऱ्या प्रत्येकाला होते. व्यक्ती व्यक्तीप्रमाणे या बाधेचा प्रकार, त्याची लक्षणे, गंभीरता आणि कालावधी बदलतो. शारीरिक jetlag हे जास्तीत जास्त ८-१० दिवसात आटोक्यात येतात पण मानसिक व इतर jetlag हा काळजीचा विषय होऊ शकतो. यातील काही महत्वाच्या jet-lag ची इथे चर्चा करण्यात आली आहे.

१. Traffic jetlag - इथे आल्या आल्या त्याला २ व्हीलर, ऑटो रिक्षा Unsafe वाटू लागतात. रस्ता ओलांडताना भीती वाटू लागते. चार चाकी वापरावी तर righthand ड्रायव्हिंग बॅकवर्ड वाटू लागते. उजवीकडून कोणी

ओव्हरटेक केले कि, घाम फुटतो. अशी लक्षणे दिसली तर Traffic jetlagची बाधा झाली आहे. हा jet lag सहा महिने न गेल्यास traffic फोबिया झाला असे समजावे आणि यावर मानसोपचार तज्ञा कडून treatment घ्यावी. या traffic jet-lag चा दुसरा प्रकार म्हणजे याचा बाधित पेशंट प्रत्येकाला अमेरिकेच्या traffic सेन्सबद्दल, शिस्तीबद्दल सांगत सुटतो. ही बाधा फारच वाढली तर या देशातील traffic कशी सुधारेल याची चार चौघात रुजवात करू लागतो. नोकरीनिम्मित्त गेलेली तरुण मुले इथे आल्यावर आई वडिलांचा हात धरून रस्ता ओलांडू लागतात. या प्रकारात सुधारण्याची शक्यता फार नसते. मी मात्र आल्या दिवशीच सायंकाळी ६ वाजता गाडी काढून घरातून via स्वारगेटहून कोथरूडला चक्कर मारली. गाडी खाली आत्महत्या करण्याचा प्रयत्न करणाऱ्या ६ जणांना करकचून ब्रेक दाबुन वाचवले आणि करकचून शिव्या दिल्या. मला सर्वांच्या पुढे जाण्यास रोखणाऱ्या पुणेकरांना कर्कश्य हॉर्न वाजवून साईड देण्यास बजावले. मीच कायम पुढे राहील यासाठी डावीकडून उजवीकडून आणि जमेल तिथून ओव्हरटेक करून घेतले. एका मोठ्या पीएमटी बसला हॉर्न देऊन साईड देण्यास लावले. सगळ व्यवस्थित पूर्वीसारखे जमते आहे याची खात्री झाल्यावर Traffic jet-lag नाही हे कन्फर्म झाले.

२. फूड jetlag: या प्रकारात देशी अन्न हाय कॅलरी, स्पायसी वाटू लागते. चहातील साखर आणि दुध विषासमान वाटू लागते. भात तर वर्जच करतात. लाडू, पुरणपोळी, गुलाबजांब इत्यादी पदार्थ पहिले की त्रास होतो. वैशाली, रुपाली, वाडेश्वर इथे खाणारी मंडळी असेच खात राहिले तर आयुष्य संपून जाईल याची खात्री वाटत रहाते. माझ्या माहितीचा एक तरुण पेशंटला त्याच्या आईने लेकरू खूप दिवसांनी अलय असे म्हणून त्याच्या आवडीचा बेसनाचा लाडू दिला, तर तो पेशंट hostile होऊन याचे ingredients, fats, कार्बोहायड्रेट्स आणि कॅलरी कळल्यानाहीत तर खाणार नाही असे आईस सुनावतो. आईने जास्त आग्रह केला तर मला काही झाले तर तर “I will sue you” अशी धमकी दिली. ती माउली बिचारी याला काय झालाय म्हणून काळजीत पडली. हा jetlag लवकर गेला नाही

तर वजन झपाट्याने कमी होते, पेशंट त्याची परवा करत नाही आणि उपासमार करून घेतो. ४-६ महिन्यात आटोक्यात आला तर ठीक नाहीतर मुलास इमेल करून अमेरिकेचे तिकीट पाठवण्यास सांगावे. मुंबईहून येताना एक्स्प्रेसवेवर रमाकांतचा वडा-पाव खावा वाटला तर धोका नाही असे समजावे.

३. बिस्लेरी jetlag – यात कायम बिसलेरी वापरावी लागते. दिवसात १० बाटल्या खपू लागल्या आणि दिवसाला १५०-२०० रुपयांना चाट पडली तर मुकाट्याने नॉर्मल पाणी पिऊ लागतो. असे झाले नाही तर प्रकरण गंभीर आहे असे समजावे.

४. सांस्कृतिक jetlag: अमेरिकेत तेथील संग्रहालये, ऑपेरा, अक्वेरीयम, झू अशा स्थळांना भेटी दिल्या की, या प्रकारचा lag येतो यात पुण्यातील (किंवा भारतातल्या कोणत्याही शहरातील) सर्व संग्रहालयाचे आपण क्युरेटर बनून सुधारणा घडवून आणाव्या वाटतात. बालगंधर्व, टिळक स्मारक या सारख्या नाट्यगृहांच्या सल्लागार पदी आपली नेमणुक व्हावी असे वाटू लागते. भारतातल्या कला क्षेत्रात आपण भरीव काही तरी करू शकू असा confidence वाटू लागतो. पर्वतीवर जाण्यासाठी १०० रु. तिकीट ठेवले तर पर्वती स्वच्छ राहील असे वाटू लागते. शनिवारवाड्यात पेशव्यांचा इतिहास जिवंत करावा वाटतो. अशी अनेक लक्षणे देता येतील या प्रकारचा jetlag अमेरिकेतून आल्यावर अनेक वर्षे टिकू शकतो. इथे आल्यावर शाहरुखचा लेटेस्ट सिनेमा, एखादे मराठी हॉट मराठी नाटक बघितले आणि शनिवार वाड्या भोवती २ व्हीलरने प्रदक्षिणा घातली तर jet-lag लवकर आटोक्यात येऊ शकतो. उभयतांनी अमेरिका वारी केली असेल तर उपचारात आपल्या पत्नीलादेखील सहभागी करावे.

५. सामाजिक jet-lag : रस्त्यावरील दुचाकीस्वारांना वाहतुकीचे धडे ध्यावेसे वाटतात. सर्व शाळात जाऊन मुलांवर समाजजीवनाचे संस्कार घडवून आणावे वाटतात. शहर सुंदर असावे असे वाटू लागेल. याची सुरवात शहरातील राजकीय फ्लेक्स काढून करावी असेही वाटेल. नगरपालिका मोकळया जागी लॉन

आणि फुलझाडे का लावत नाही? असा प्रश्न तुम्ही पालिका सोडून ज्याला त्याला विचाराल. शहरातील सार्वजनिक वाहतुकीचा प्रश्न सोडवावा वाटेल. मेट्रोचे मार्ग सुचवू लागाल. पीएमटी कार्यक्षम झाली आहे अशी दिवास्वप्ने पडू लागतील. ही सर्व लक्षणे सामाजिक jet-lag ची असून. उपाय म्हणून ४-५ वेळा अमेरिकेत जाऊन आलात या jet-lagचा कंटाळा येऊन कमी होण्याची शक्यता असते. हळू हळू इथले असेच राहणार याची खात्री पटते आणि हा jet-lag कंट्रोल मध्ये येऊ शकतो.

६. राजकीय jetlag: यामध्ये देशात अध्यक्षीय लोकशाही आली तरच या देशाचे अनेक प्रश्न सुटतील असे वाटू लागते आणि चारचौघात याची चर्चा घडवून आणावी वाटते. कोणतीही निवडणूक आली की, उदासी वाटू लागते. शहरातील फ्लेक्सचा त्रास वाटू लागतो. राजकारण बाजारबूणग्यांचा खेळ वाटू लागतो. बातम्या बघताना दात ओठ खाल्ले जातात. अण्णा हजारेंच्या कळपात सामील व्हावे वाटते. अमेरिकेतून महिनाभर राहून आलेला आमचा एक मित्र विवेक वेलणकरांना भेटून सजग नागरी मंचाचा सदस्य झालाय. फार अवघड असा हा lag आहे. ही माणसे निवडणुकीत मतदानावर बहिष्कार घालतात.

७. आर्थिक jetlag: लघु व मध्यम उद्योजक मंडळींना या व्याधीची बाधा होते. यात देशात एक्साईज, वॅट, एलबीटी, सर्व्हिस टॅक्स, W.C टॅक्स इ.कर जाऊन एकच कर लागू केला तर उद्योगास पोषक वातावरण होईल, उद्योग धंदे वाढतील, बेकारी घटेल, असे ठाम पणे वाटू लागते. तुम्ही अमेरिकन भांडवलशाहीचे गोडवे गाऊ लागतात. ५ डेज वीक मुळे कार्यक्षमता वाढते असेही वाटू लागते. देशाच्या आर्थिक सल्लागार मंडळात आपल्याला घेतले तर देश बदलून टाकू असे जाहीरपणे बोलून दाखवतात. कोणत्याही परिस्थितीत ही बाधा आटोक्यात येत नाही. अशा अशक्य आणि अतर्क्य बोलणाऱ्या व्याधीग्रस्त उद्योजकांची MCCI, असोचेम आणि फिक्की अशा संस्थातून हकालपट्टी करण्यात येते.

८. एक अतिशय धोकादायक jetlag सापडला आहे. याला अजून नाव देता आले नाही. हा बहुतांशी स्त्रियांमध्ये दिसून येतो. यात पत्नी एकटी अथवा

तुमच्या बरोबर अमेरिकेस गेली. तर इथे आल्यावर घराचा चेहरा मोहरा बदलण्याचा आग्रह करू लागते. अमेरिका वारीने आधीच तुमचा खिसा रिकामा झालेला असतो त्यात ही भर पडते. एकंदर अमेरिका प्रवास खर्चाच्या १० पट खर्च इथे आल्यावर लागू शकतो. अमरिकेतील पुरुष स्त्रियांच्या खांद्याला खांदा लाऊन गृह कर्तव्य करताना पाहून भारतातही हा बदल घडवून आणण्यास या स्त्रीया कटिबद्ध होतात. या प्रकारात बाधा स्त्रियांना होते पण त्रास मात्र पुरुषांना होतो व उपचार पुरुषांना घ्यावे लागतात. पुरुषांचे उत्पन्न आजच्या ६० पटीने वाढले तरच या आजारास तोंड देता येते.

मानसोपचार तज्ञ सामाजिक, राजकीय आणि आर्थिक jet-lag ची बाधा १ महिना व अधिक टिकली तर ही केस हाताबाहेर गेली आहे असे समजतात आणि हा jet-lag संसर्गजन्य असल्याने बाधित व्यक्तीस इतर भारतीय समाजापासून दूर ठेवावे असे सुचवतात. एकंदर अमेरिकन jetlag ही काळजी निर्माण करणारी गोष्ट आहे. यासाठी भारतातील सर्व अंतर राष्ट्रीय विमानतळांवर arrival गेट वर “ठेविले अनंते तैसेची राहावे” अशी मोठ्ठी होर्डिंग लावावीत आणि एयर इंडियाच्या विमानात ही ट्यून वाजवावी असा प्रस्ताव मांडण्यात येणार आहे. एकंदर अमेरिकन jet-lag या व्याधीवर उपचारासाठी मानसोपचारात स्वतंत्र शाखा निर्माण होण्याची गरज आहे. एक मात्र नक्की तुमच्यात जर जाज्वल्य देशाभिमान असेल तर यातील कोणत्याही jet-lagचा त्रास होत नाही.

# Stop and Go

अमेरिकेत आल्यावर एक खोड लागते ती म्हणजे सारखी आपल्याशी तुलना करण्याची. काय योग्य काय अयोग्य हे ठरवण्याची. असे करणे योग्य का अयोग्य माहित नाही पण तुलना होते जरूर. आता हेच पहा ना ! काही सिंग्नल विरहित चौकात “stop and go” अशी पाटी असते. चारही पैकी ३ रस्त्यावर एकही गाडी नसते. एका दिशेने एकच गाडी येते. “stop and go” अशी पाटी ड्रायव्हवर पाहतो आणि चौकात गती क्षणभर का होईना पूर्ण शून्यावर आणतो आणि पुन्हा गाडी सुरु करतो. हे जागो जागी घडते. आपल्याकडे लाल सिग्नलला पोलीस नाही (बाकीच्यांची फिकीर करण्याची जरूरच काय?) असे पाहून गाडी न थांबवता लाल सिग्नल भेदून जाण्यातली राक्षसी गंमत या देशात नाहीच. असे करताना कोणाची प्राणांतिक फजिती झाली तर सोनेपे सुहागा. सेफ्टीचे अमेरिकेला पराकोटीचे वेड आहे. प्रथम दुसऱ्याची सुरक्षा मग आपली हे तत्व रुजले आहे. अर्थात आपण आनंदाने जगताना आपला सह-नागरिकपण आनंदात जगला पाहिजे ही भावना प्रत्येकजण मनात घेऊन जगतो. इतर वेळी धाव-धाव धावणारा अमेरिकन “stop and go” साठी मोकळया रस्त्यात वेळ काढतो ती केवळ दुसऱ्याच्या सुरक्षेसाठी! हे आपल्याकडे कधीही रुजेल असे मला वाटत नाही. आपल्यासारखी परपीडेत असुरी आनंद घेणारी मंडळी इथे नाहीच.

अर्थात हे घडून यायला प्रत्येकवेळी “stop and go” पाटी असलीच पाहिजे असे नाही. उदा. एखाद्या भरधाव रस्त्याने गाड्या जात आहेत आणि आपण रस्ता ओलांडण्यासाठी पाउल नुसते उचलेले तरी सर्वात पुढचा ड्रायव्हर आधी थांबतो. मग मागच्या गाड्या पटापटा थांबतात. बिचारे आपण आपल्यामुळे एव्हडी ट्राफिक खोळंबली म्हणून खजील होते ( पुण्यात असे खजील होण्याचे कारण नाही) . पाउल मागे घेतो आणि समोरच्या ड्रायव्हरला “पहेले आप” असे खुणावतो. पण कसचे काय ड्रायव्हर त्यालाच हसत खुण करतो “नही नही पहेले आप!” आणि आपण सुखरूपपणे दुसऱ्या टोकाला जायीपर्यंत शांत बसून राहतो त्याच्या मागे इतर ट्राफिक. तो टोकाला पोहचल्याची खात्री करून ड्रायव्हर हसत हसत वर आपल्यालाच “thank you” म्हणत गाडी सुरु करतो मागोमाग खोळंबलेली वाहने सुरु होतात. आपण जर सूज्ञ असू तर या पासून धडा घेतो. पुण्यात जर असे घडले तर काही महाभाग आपल्यामुळे ट्राफिक थांबवण्याचे असुरी मजा घेतील यात शंकाच नाही. हे “stop and go” प्रकरण लहान मुले, सिनियर सिटीझन, अपंग आणि अनोळखी कुणीही (त्यात आमच्या सारखे अमेरिकेत गोंधळलेलले प्रवासी) यांच्या बाबतीत चालू असते. हे करताना “हाय”, “हावू आर यू” अशी सुहास्य चौकशी पण चालू असते.

“stop and go” म्हणजे we care for you (आम्हाला तुमची काळजी आहे). हे कल्चर (पक्षी:संस्कृती) आहे. we care for you ह्याचाच व्यक्त प्रकार म्हणजे शहरातल्या पाट्या. शहरात आलेल्या कोणालाही आपण या नवख्या भागात हरवलो नाहीत असा ठाम विश्वास देणाऱ्या या पाट्या. अखिलचा पत्ता ८१८१ फेनीन स्ट्रीट असा आहे. हा फेनीन स्ट्रीट फार मोठा आहे. या फेनीन स्ट्रीटवर तुम्ही कुठेही असा तिथल्या प्रत्येक इमारतीवर मोठ्या अक्षरात XXXX फेनीन स्ट्रीट असा मोठ्ठा बोर्ड दिसला की, आपण आपल्याच रस्त्यावर आहोत अशी प्रथम जाणीव होते. रस्त्याच्या एका बाजूला ७२०१, ७२११, ७२२१ असे ऑड नंबर्स आणि दुसऱ्या बाजूला ७२००, ७२१०, असे इव्हन नंबर. आपला पत्ता ८१८१ फेनीन स्ट्रीट आहे म्हणजे रस्त्याची ७२०१ ची बाजू धरायची आणि सरळ

७२११,७२२१,७२३१ करत ८१८१ पर्यंत ३-४ कि.मी गेलात की आले ८१८१ फेनीन स्ट्रीट. हे समजायला फार कॉमन सेन्स लागत नाही. १२३६ सदाशिव अलीकडे १७२० सदाशिव आणि पलीकडे ७२२ सदाशिव (जुना कि नवा? हा वेगळा प्रश्न ) ही मजा इथे नाही.

रस्त्यावरच्या सर्व पाट्या ठसठशीत मोठ्या असतात. अंतर दाखवणाऱ्या पाट्या वर ड्रायव्हरच्या नजरेच्या टप्प्यात जाताजाता सहज येतील अशा. अमेरिकेत मैलाचा पिवळा दगड जर आपल्यासारखा रस्त्याच्या कडेला बसवला तर अमेरिकेची गती कमीतकमी निम्याने कमी होईल. आपल्याकडे आधी मैलाचा दिसणार नाही याची काळजी सरकार घेते चुकून दिसलाच तर त्यावरचे आकडे दिसणार नाहीत याची काळजी धूळ घेते. इकडच्या रस्त्यावरच्या पाट्या हा स्वतंत्र अभ्यास विषय आहे. ह्या पाट्या दिशादर्शी, रस्तादर्शी, अंतरदर्शी, सुरक्षादर्शी असतात. “विमानतळ २५ मैल असून त्यासाठी आत्ता आहात तिथून २.५ मैलावर उजवीकडे वळायचे आहे तुम्ही उजवीकडच्या पहिल्या अगर दुसऱ्या लेन मध्ये रहा.” असे जर मोठ्ठ्या अक्षरात प्रेमाने लिहिलेलं असेल तर वाहन चालवणे किती सुकर होते ? रस्त्यावर ७५-८० वर्षाच्या म्हाताऱ्यादेखील झोकात एस.यू.व्ही. गाडी चालवतात ते या पाट्यांच्या जोरावरच! या पाट्या वाचायचे बाळकडू म्हणजे साक्षरता आणि अमलात आणणे म्हणजे संस्कृती. अमेरिकेत जगण्यासाठी कॉलेजात जाण्याची गरज नाही पण ट्राफिकसाक्षरता मात्र हवीच. पक्षीण जशी ७व्या - ८व्या दिवशी आपल्या पिलाला घरट्यातून बाहेर काढून उडायला लावते, तसे अमेरिकन आई बाप १५-१६व्या वर्षी मुलाला व मुलीला गाडी शिकवतात. मुल वेळेत गाडी शिकत नसेल तर त्यांच्या दृष्टीने ही काळजीची गोष्ट ठरते.

गती हा अमेरिकन्सच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. ही गती नुसती टिकवायची नाही तर वाढवायची असते. मध्ये येणारे अडथळे सिस्टम वापरून काढले जातात. गती कमी करणारे स्पीडब्रेकर नाहीतच. जीवनाची गती वाढलीच पाहिजे आणि ती वाढवताना जीवन आधीकाधिक सुकर आणि सुरक्षित कशी होईल हे पहिले जाते. रस्त्यांची आखणी, रस्त्यावरच्या पाट्या, त्यावरील खाण्याचे मॉल्स हे सर्व सुरक्षा आणि गती अबाधित राहील अशी केलेली असते. हायवे वर कोणताही

रस्ता ९० अंशात छेदत नाही. हायवेला मिळणारे आणि हायवेवरून बाहेर जाणारे रस्ते ३० अंशात जोडलेले असल्याने इतर वाहनास धोका नाही आणि गती पण कमी करावी लागत नाही. पाट्या कमी पडतात म्हणून आता प्रत्येक गाडीत जीपीएस आली आहेत. गाडी चालवता चालवता कोणीतरी माहितगाराने शेजारी बसून आपल्याला तोंडी सूचना दिल्या तर किती बरे वाटेल. हे जीपीएस या वाटाड्याचे काम करते. तुम्हाला नुसती वाट दाखवत नाही तर तुमच्या मुक्कामी पोचायला किती वेळ लागेल हे दाखवते, चुकून चुकलात तर तुमची चूक दुरुस्त करून मुक्कामी कमीतकमी वेळात पोचवणे हे काम हे जीपीएस करते. ट्राफिक जाम असेल तर पर्यायी मार्ग दाखवते. काही अपरिहार्य ठिकाणी सिग्नल्स असतात वाहने थांबतात आणि हिरवा सिग्नल आला की पुढे जातात. आपल्याला हिरवा दिवा दिसला म्हणजे आपल्या पुढच्याला तो दिसला असणारच याची खात्री असल्याने कोणीही हॉर्न वाजवतच नाही. मुकाट्याने पुढचा सुरु झाला की आवाज न करता आपले वाहन सुरु करतात. आपल्यासारखा हिरवा दिवा फक्त आपल्यालाच दिसला आणि हे पुढच्यांना कोकलून सांगितलेच पाहिजे म्हणून पॅ S S S पॅ असा गलका नाही.

एकंदर गती ही हवीच पण सुरक्षा आधी. रस्त्यावर पाट्यांची गर्दी असली तरी अवास्तव जाहिराती नाहीत. फूड मॉल्सच्या, पेट्रोल पंपाच्या जाहिरातीसाठी एक हिरवा बोर्ड असतो त्यावर ठळकपणे मॅक-डी, सबवे, वेंडीज ई.चे एकाच साईजचे लोगो चिकटवले असतात. कोठेही भडकपणा नाही. फक्त इथे हे मिळते एव्हडे कळले म्हणजे झाले. रस्ता सुंदरच दिसला पाहिजे. ड्रायव्हरचे चित्त विचलित करणाऱ्या मल्लिका शेरावतच्या सिनेमा जाहिराती किंवा साहेबांच्या वाढदिवसांच्या शुभेच्छा कोठेही नाहीत की राहुल गांधींचे किंवा नरेन्द्रभाईचे शहरात केलेले स्वागत नाही.

एकंदर या देशात go and stop सिस्टीम न वापरता stop and go सिस्टीम पॉप्युलर दिसते आहे.

# America - Tissue Culture

विमानात चेहरा पाण्याने घुतल्यासारखा फ्रेश राहावा म्हणून पर्याय असलेल्या सुगंधी टिश्यूपासून टिश्यूची ओळख होते. भारतात आता ग्रोसरी मालाबरोबर टिश्यू आपल्याही घरी चंचू प्रवेश करता झालाय. त्यामुळे हे ड्राय क्लिनिंग फार मोठा कल्चरल धक्का आता देत नसले, तरी या टिश्यूशी अमेरिकेत जुळवून घेणे जरा अवघडच जाते. कारण त्याचा स्पर्श हात आणि चेहऱ्यापुरता मर्यादित न राहता अंगप्रत्यांगावर करावा लागतो. अर्थात त्याचा वापर अपरिहार्य आणि अटळ असल्याने वापर करणे अनिवार्य होऊन बसते. माझ्या व्हिसाच्या इन्टरनेट वरील DS 160 व्हिसा फॉर्म खाली बारीक अक्षरात अमेरिकेतल्या कुठल्यातरी कागदबंदी कायद्यानुसार प्रिंट काढली तर विसा मिळणार नाही, असे स्पष्ट लिहिले होते. मी व्हिसा मिळवताना १०० वेळा खात्री करून घेतली की, आपण प्रिंट काढली नाही. हिला पण सांगितले होते मी चुकून प्रिंट काढू लागलो तर मला चिमटा काढ. अमेरिकेला व्हिसा न देण्याला कोणतेही निमित्त पुरते (पक्षी-पाद्याला पावट्याचे निमित्त)म्हणून काळजी. त्यामुळे मी सुरवातीला सर्व ठिकाणी टिश्यू काळजीपूर्वक कमीतकमी वापरत असे न जाणो कागदबंदी कायद्याखाली खाजगीत तुम्ही टिश्यू किती वापरता यावर तेथील सरकारची नजर वगैरे असली तर? मग लक्षात आले

अमेरिकन माणसाचे टिश्यू शिवाय पान हलत नाही. अमेरिका कागद आणि टिश्यू यात सोयीस्कररित्या फरक करते. पण अमेरिकेतील mart मधील मोठ्ठा सेक्शन या टिश्यू पेपरने व्यापला आहे आणि अमेरिकेतील घरात तो हत्तीच्या पावलांनी येतो. हत्तीच्या पाया एव्हडे जाड टिश्यूरोल अमेरिकन माणसाच्या ग्रोसरी सामानात उठून दिसतात. अमेरिकेतील वास्तव्यात मला काही गोष्टी लक्षात आल्या.

एकंदर टिश्यू हे अमेरिकेतील सर्वात उपयुक्त संशोधन आणि सर्वात जास्त उपयोगात आणलेले संशोधन आहे. भारतीय मनास हे पटणे अवघड आहे आणि कोणास पटते की, नाही याचा सच्चा अमेरिकन विचारच करत नाही.

(Joseph Gayetty या माणसाने १८५७ साली Gayetty paper या नावाने प्रथम याचे पेटंट घेतले. "The greatest necessity of the age! Gayetty's medicated paper for the water-closet. या tagline ने हा paper जाहिरात त्या काळात केला जात असे.).

अमेरिकेच्या वैयक्तिक आणि सार्वजनिक स्वच्छतेचे गमक म्हणजे टिश्यू हेच आहे असेच म्हणावे लागेल. अमेरिकेत भारताच्या माणशी ३०० पट टिश्यू ( माझ्या मते हा वापर १०००० पट पण असू शकतो.) वापरला जातो.

अमेरिकेतील एक माणूस वर्षाला रेस्ट-रूम (अमेरिकन सभ्यतेला साजेसा शब्द कारण सच्चा अमेरिकन फक्त तिथेच रेस्ट घेतो. पण तेथील स्वच्छता बघता तिथे झोप येण्याची शक्यता नाकारता येत नाही.) मधील स्वच्छतेसाठी ४९ रोल्स म्हणजेच ४९००० शीट्स वापरतो, म्हणजेच २.८ मैल म्हणजेच ५६०० sqft. म्हणजे ५२.२३ डॉलरचा paper वापरतो. यात हात, आणि चेहरा पुसण्याच्या टिश्यूचा उल्लेख नाही.

हा टिश्यू अमेरिकन वैयक्तिक आणि सार्वजनिक आरोग्याचा अविभाज्य भाग बनला आहे. अमेरिकन माणूस wet cleaning ऐवजी dry cleaning सोयीचे

समजतो आणि हे cleaning धुणे या क्रिये पेक्षा पुसणे या क्रियेने जास्त होते असे ते समजतात. त्यामुळे आजवरच्या वस्तूची सोयीस्कर उपयुक्तता (convenience ला पर्यायी मराठी शब्द नुसता सोय अथवा नुसती उपयुक्तता असा होऊ शकत नाही.) या संशोधन निकषावर ६९% मार्क्स मिळवून टिश्यू आजही नंबर वन आहे. ZIP ला ४२%, फ्रोझन फूड ३७ % व Mobile, Car, Microwave इत्यादी गोष्टी टिश्यूच्या या निकषावर फार फार मागे आहेत. या टिश्यूचे facial tissues, wrapping tissues, paper towels, table napkins, toilet tissues, kitchen napkins and so on असे अनेक प्रकार मिळतात. हे टिश्यू अनेक स्वरूपात मिळतात उदा. rolls of different widths, sheets of different sizes, shapes, thicknesses, layers (ply), designs, patterns and textures. हे टिश्यू बनवण्यासाठी Inter-national Standard असून त्यासाठी त्याचा Absorbency, basis weight, thickness (bulk), brightness, stretch, appearance and comfort इत्यादी गोष्टींचा विचार केला जातो. अखिलने एक टिश्यूचे रॅपर दाखवले त्यावर ई विटामिनयुक्त असे छापले होते. “स्कीन साठी उत्तम” असा त्या कंपनीचा दावा होता. कित्येक कलाकारांना टिश्यू हा आर्ट मिडिया वाटतो. Kimberley and Clerk ही जगातील टिश्यू बनवणारी multinational कंपनी आहे. ही कंपनी केवळ टिश्यू बनवण्यासाठी झाडे लावते आणि त्यांची मशागत करते. अमेरिका पेट्रोल आणि टिश्यू यांच्या वापरावर कोणतीही compromise करणार नाही हे जग आणि तेथील राजकीय पक्ष जाणून आहेत. अमेरिकेत कमालीची स्वच्छता दिसते त्यात त्यांच्या सवयी बरोबरच या टिश्यूचा मोठा हात आहे. आणि तसा विचार केला तर टिश्यूचा वापर खरेच सोयीचे आहे याचे प्रत्यंतर येते. उदा. हॉटेलमध्ये जेऊन झाले की, आपल्या डिश कचऱ्यात टाकताना टेबलावरचे खरकटे त्या डिश मध्ये पुसून टाकणे हा अमेरिकन सेल्फ सर्व्हिसच्या शिस्तीचा भाग. जर टिश्यू नसेल तर असे टेबल फडक्याने पुसणे, ते देखील ग्राहकाने, आपल्यावर काय आफत ओढवेल? याचा विचार करा.

अमेरिका एक दावा करते की, हे टिश्यू रिसायकल केले जातात किंवा बायो-डीग्रेडेबल असतात. खरे खोटे रामास ठाऊक पण त्यांना टिश्यूचा वापर करण्यावरून कोणी रोखू शकेल असे वाटत नाही. एक वेळेस पेट्रोलला पर्याय निघेल आणि निघाले देखील आहेत. पण टिश्यूला नाही. अमेरिकन टिश्यूविषयी एका मित्राशी बोललो तर तो लगेच उसळून म्हणाला “एका टिश्यूसाठी किती झाडे कापतात?, किती पाणी लागते?, किती पोल्युशन होते? याचा कोणी विचार केला आहे?” पण अमेरिका कोण काय म्हणेल याची पर्वा करत बसत नाही. अमेरिकेतील माणूस भारतीय अस्वच्छतेविषयी आणि बेशिस्तीविषयी बोलला तरी आपण थोडीच त्याची पर्वा करतो. तसेच आहे. शेवटी ज्याचे त्याचे त्याच्यापाशी अशी म्हणच आहे ना! एक मात्र नक्की आपल्याकडे टिश्यू वापरण्याची लायकी डेव्हलप होणे मुश्कील आहे, अमेरिकेत टिश्यूचा इतका वापर आहे पण रस्त्यात कुठही टिश्यूचा साधा कपटाही दिसत नाही तसेच प्लास्टिकचे आहे. आपल्याकडे टिश्यू मुक्तपणे वापरू लागलो तर काय होईल याची कल्पना न केकेली बरी. त्यामुळे टिश्यूचा वापर योग्य की अयोग्य या तात्विक चर्चेस अर्थ नाही. ते एक अति convenient (उपयुक्त आणि सोयीची) वस्तू म्हणून ते वापरतात. बाय द वे आमच्या पत्नीने येताना एक टिश्यूरोल आणला. मला कस्टमवाले अडवतील का? अशी भीती होती मी ती बोलून दाखवली तर ही म्हणते कशी “माझी मी बघून घेईन. तुला का काळजी.)

कुसुमाग्रजांच्या “काही गोड फुले सदा विहरती” च्या धर्तीवर असेही म्हणता येईल.

काही सुगंधी टिश्यू विहरती स्वर्गांगनांच्या गाली

काही वाहुनी जाती रेस्टरूमी

पुनर्जन्मही (recycle) नसे नशिबी

and so on.

# For here or to go

अमेरिकन गतिमान जीवनात जेवण गतिमान होणे अपरिहार्य झाले आहे. इतके कि, निवांत जेवणे हा या गतीतील अडथळा ठरले. दोन्ही वेळेस शक्यतो व्यवस्थित ताट, पाट आणि पाणी घेऊन, डावे उजवे वाढून, मग पहिला भात ते शेवटचा भात असे निवांत जेवणाची सवय असणारे आपण यात भांभावून जातो. आता जेवण बनवणे आणि ते निवांत जेवणे हा सार्वजनिक गतीतील सार्वजनिक अडथळा ठरल्यावर आणि न जेऊन चालत नसल्याने अमेरिकन सिस्टीमप्रमाणे त्यावर उपाय काढणे जरुरी ठरले. एकदा खाण्यातील वेळ कमी करणे एकदा हा राष्ट्रीय प्रॉब्लेम ठरला की, सर्व बाजूने या प्रॉब्लेमवर सोल्युशन काढण्यावर संशोधन सुरु. मग सर्वजण यात व्यवसायसंधी म्हणून बघू लागतात. आपल्याला हवे तसे सांस्कृतिक वळण समाजाला लावण्यास अमेरिकन कंपन्या फार वाकबगार आहेत. गेल्या ४०-५० वर्षात घरी जेवण बनवणे अमेरिका जवळजवळ विसरून गेली आहे. (इथले भारतीय त्याला अपवाद आहेत.) शास्त्रज्ञ टिकावू अन्नपदार्थ कसे बनवता येतील हे शोधू लागले, इंजिनियर्स आणि प्रोसेस एक्स्पर्ट ते कमीत कमी वेळात बनवून त्याचे पॅकेजींग करणारी मशीन बनवू लागले, मग रेफ्रिजरेशन इंजिनियर आणि ऑटोमोबाईल इंजिनियर ते पदार्थ एका ठिकाणाहून दुसरीकडे पोचवता येईल अशी

वाहने बनवू लागले. यासाठी प्रचंड फूड प्रोसेसिंग करणारे कारखाने, वितरण करणारी व्यवस्था आणि ग्राहकांपर्यंत देणारी रिटेल व्यवस्था अशी मोठ्ठी साखळी तयार झाली. या साखळीत रेडी टू ईट फूड देणारे mac-D, सबवे, वेंडी आणि असे अनेक पोटात ढकलण्यासाठीचे ब्रांड निर्माण झाले, तर मधून तोंडात टाकायला बटाटा चिप्स आणि वेपर्सचे लेय असे ब्रांड तर पोटात पाणी ओतण्यासाठी कोक आणि पेप्सी सारखे पेये निर्माण झाली. उदरभरणाचा सोपस्कार जास्त. यज्ञकर्म नाहीच. यात जेवणाला वेळेचे बंधन नसल्याने हाडाचा अमेरिकन केव्हाही खाताना अगर पिताना दिसतो. चवीने खाण्यापेक्षा अनेक चवी घेण्यात मजा येत असल्याने अनेक अमेरिकन फूड अॅडीक्ट झाल्यासारखे बकाबका खातात. घास करून न खाता एखाद्या जनावराप्रमाणे मोठ्ठा बकासुरी 'आ' वासून खातात (हे सगळे वेळ वाचवण्यासाठी बरे का!) तुम्हाला ब्रान्डच्या रेस्टॉरंटमध्ये बसून खायला वेळ नसेल ( आणि तो नसणारच) तर एका खिडकीशी गाडी उभी करा ऑर्डर द्या आणि "for here or to go" मधला 'to go' हा option घेऊन गाडी चालवता चालवता खा. बरोबर कोक वा पेप्सी प्या. ठेवायला गाडीत सोय आहेच. पण गाडीचा वेग कमी करू नका.

दुसरा प्रकार म्हणजे घरी आपल्या चवीचे बनवण्यापेक्षा अर्धवट तयार गोष्टी घेऊन त्या घरी आणायच्या फ्रीजमध्ये साठवायच्या आणि फक्त गरम करायच्या किंवा दिलेल्या सूचनांप्रमाणे मिक्स करायच्या आणि खायच्या. त्या पदार्थांच्या चवीचे देखील प्रमाणीकरण (Standardisation) झालेले असते. एकाच चवीचा कोक, एकाच चवीचे मॅग डी, सबवे ही मंडळी वर्षानुवर्षे पितायत किंवा खातात. पण कोणीही असे म्हणू शकत नाही की, कोक आता पूर्वीच्या चवीचा मिळत नाही. कुठेही घ्या तिच चव जो प्रकार कोकचा, तोच सबवेचा आणि तोच mac-Dचा. अमेरिकन माणसास तीच चव लागते. "आजी/मामी/मावशी/काकू/वाहिनी तुझ्या हाताची चव काही वेगळीच" किंवा "आई, आज आळूची भाजी वेगळी झाली फार मजा आली." हे अमेरिकन माणूस म्हणू शकत नाही.

खाण्याच्या बाबतीत अमेरिका फार विरोधाभासी आहे. कोणतेही शेतीचे उत्पन्न तो प्रथम जनावरांना खायला घालतो. ते खाऊन गुबगुबीत झालेल्या जनावरांच्या मांसापासून अन्न बनवतो ते खातो मग असे रिच फूड खाऊन स्वत: गुबगुबीत होतो आणि बारीक होण्यासाठी वेट कंट्रोलची औषधे घेतो. प्रत्येक पदार्थावर त्यातील कॅलरिज, प्रोटीन्स, कार्बोहायड्रेटस आणि काय काय लिहिले असते. असे लिहिणे कायद्याने बंधनकारक आहे. “पण लक्षात घेतो कोण?” तरी अति खाण्याच्या सवयीने ओबेसिटी हा पण मोठा राष्ट्रीय प्रॉब्लेम होऊन बसलाय आणि त्यापेक्षा जास्त तो प्रॉब्लेम इन्शुरन्स कंपन्यांचा झालाय. आता यावर संशोधन करून आवडतंय ना मग तुम्ही कितीही खा पण आमचे वजन कंट्रोल करणारे औषध घ्या आणि बारीक रहा अशी औषधे निर्माण करणारे संशोधन चालू आहे. म्हणजे एक वेट कंट्रोल नवीन इंडस्ट्री उभी रहाते. यालाच अमेरिकन इकॉनॉमी असे म्हणतात. प्रॉब्लेम निर्माण करायचा आणि मुलभूत विचार न करता त्या प्रॉब्लेमवरील सोल्युशनचा व्यवसाय कसा करायचा हे बघायचे आणि हा व्यवसाय टिकण्यासाठी (याला “इकोनॉमी वाढती राहण्यासाठी” असेही म्हणतात असे सच्चा अमेरिकन म्हणतो.) प्रॉब्लेम तसाच ठेवायचा किंवा कसा वाढेल हे बघायचे, म्हणजे व्यवसाय अव्याहत चालू राहतो. ऑटोमोबाईल, कॉम्प्यूटर, फूड, औषधे सगळ्या क्षेत्रात हे असेच चालले आहे. इथे प्रॉब्लेमस् आणि सोल्युशनस् हातात हात घालून जगतात, वाढतात. आहे का नाही गंमत !!

# Sharing America

अमेरिकेच्या विषयी आपले काय मत असावे, या विषयी प्राचीन संस्कृती असणाऱ्या आपल्या देशात फार गंभीर कन्फ्युजन आहे (मी पण त्यातील एक). एकदा आपली प्राचीन संस्कृती थोर आहे अशी समजूत करून घेतली म्हणजे बाकी सर्व तुच्छ आणि गौण असा अहं येतोच. आता आपल्या संस्कृतीचा अहं तसाच ठेऊन अमेरिका पाह्यची आणि येताना तो अहं तसाच परत घेऊन यायचे, या सारखा करंटेपणा नाही. दोष काढता येणार नाहीत असे नाही. पण अनेक चांगल्या गोष्टी दिसत असताना, शोधून शोधून दोष काढण्यात अर्थ नाही.

आता हेच बघा "फलाची अपेक्षा न ठेवता कर्म करत रहा" असे आपल्या प्राचीन संस्कृतीने सांगावे आणि अमेरिकेने ते अमलात आणावे. मी जवळ जवळ १०००-१२०० फोटो काढले आणि माझ्या प्रिय मित्रांना या फोटोंचा आनंद आताच्या आत्ता द्यायचा आहे. गुगल+/फेसबुक वर जा आणि एका क्लिकवर अपलोड करा आणि सर्वांशी शेअर करा. आता कर्म कुणाचे आणि फल कुणास. काहीतरी सुंदर पहिले क्लिक करा आणि whatsapp करा आणि तुमच्या प्रियजनांना पाठवा. कोणाचे कर्म आणि कोणाला फल.

असे प्रत्यंतर अमेरकाभेटीत अनेक ठिकाणी येते. डल्लास मध्ये Dallas Arboretum & Botanical Society (DABS) या संस्थेने घडवलेल्या बागेत गेलो. ६३ एकर क्षेत्रात अतिशय कलात्मक अशी नितांत सुंदर बाग डेव्हलप केली

आहे. काही  समविचारी मंडळींनी एकत्र येऊन नॉन-प्रोफीट संस्था स्थापन करून चालवली आहे. चहूकडे झाडेच झाडे, फुलेच फुले पण बागेची मांडणी अतिशय देखणी. हॅलोविन असल्याने बागेत हजारो वेगवेगळया रंगाचे, आकाराचे, प्रकारचे भोपळे अतिशय कलात्मक मांडले होते. भोपळयात एव्हडे सौंदर्य असते हे मला प्रथमच समजले. (google+ वर फोटो शेअर केले आहेत) बागेत एकदा आत गेलात आणि नुसती वरवर बघायची म्हटले तरी ४ तासाची निश्चिंती. बाहेर आल्यावर एक अविस्मरणीय अनुभव घेऊन बाहेर पडतो. मग कळते ती एका खाजगी संस्थेची बाग आहे. आत जाताना वाटते, बाग बघायची तब्बल १२ डॉलर तिकीट? पण बाहेर आल्यावर लक्षात येते फक्त १२ डॉलरमध्ये एव्हडे!! दरवर्षी १० लाख लोक ही गार्डन बघण्यास येतात. बघा http://www.dallasarboretum.org.  आता हे कर्म कुणाचे आणि फल (आनंद) कुणास. चांगले आहे ते निर्माण करण्याचा, संवर्धन करण्याचा आणि लोकांपर्यंत पोचवण्याचा (शेअर करण्याचा) ध्यास घेतलेली मंडळी या देशात अनेक आहेत. अशी Arboretum अनेक गावात आहेत. वरील एक उदाहरण झाले.

प्रत्येक गावा-गावात अशी Science Museums, Art Museums, Space museums, City History museum, Aquariums, City Libraries, लोकांनी एकत्र येऊन स्थापन केलेली दिसतात. या सर्व ठिकाणी जायला तिकीट असते (कोणतीही गोष्ट फुकट नाही हे अमेरिकन तत्व. अपवाद लायब्ररी). प्रत्येक गोष्ट नुसतीच सुंदर नसते, तर भव्य असते, मांडणी आकर्षक असते. न्यू जर्सीत संजय बरोबर त्यांच्या गावातल्या लायब्ररीत गेलो. जाताना माझ्या डोळयासमोर आपल्या ब्रिटीश लायब्ररी सारखी इमारत असेल असे काहीसे चित्र. गेल्यावर मी अवाक् ! ब्रिटीश लायब्ररीच्या १० पट इमारत. पुस्तकांनी पूर्ण भरलेली. त्याच्या मुली (वय ९ आणि ११) धावत मुलांच्या विभागात गेल्या १० मिनिटात त्यांनी २५ पुस्तके गोळा केली. एका टेबलावर मांडून ठेवली. तेव्हड्यात संजयला लायब्ररीच्या हॉलमध्ये काहीतरी मुलांसाठी कार्यक्रम चालू आहे असे तिथल्या एका स्टाफने सांगितले. “Come on girls someone is giving

speech in the hall let's go" मुली आत पळाल्या. एक पन्नाशीचा गृहस्थ जोकरच्या पोशाखात मुलांना शास्त्रीय प्रयोग समजावून सांगत होता. मुले आणि पालक मिळून ८०-१०० जण असावेत. मुलांना आणि पालकांना हसवत/खिळवत त्याने अर्धा तास घमाल उडवून दिली. अर्ध्या तासाने कार्यक्रम संपला मुले आणि पालक हसतमुखाने आनंदात बाहेर आली. संजयच्या मुलींनी गोळा केलेली पुस्तके घेऊन त्यांची कॉम्पुटरवर नोंद केली. मी विचारले " एकदम २५ पुस्तके? " तर संजय म्हणाला "अरे ५० पण नेता येतात आणि ते पण फुकट. उशीर झाला तर दंड मात्र जबर असतो." सगळेच अवाक् करणारे. त्या लायब्ररीत २५-३० जणांचा स्टाफ होता. जवळ जवळ ५० कॉम्प्यूटर होते. खूप टेबले होती आणि पुस्तके अगणित. आणि वेगवेगळया वयाचे ३०-४० जण अभ्यास करत होते. बाहेर १०० डिस्पोजेबल पुस्तकांचा व्यवस्थित मांडलेला गठ्ठा ठेवला होता. तुम्हाला हवे असेल ते घेऊन जा. त्याच्या जवळ कोणतेही पुस्तक १ डॉलर असा पण एक गठ्ठा. इथल्या स्टाफ मध्ये बहुतांशी सिनियर सिटीझन होते बहुदा त्यांच्या व्यवसायातून रिटायर होऊन आपला वेळ सत्कारणी (पक्षी: समाजकारणी (राजकारणी नव्हे) ) लावत असावेत. अमेरिकेत आपल्यासारखे गल्लोगल्लीतले पांढरे कपडे घातलेले, गळयात चैन (पक्षी:चईण) घातलेले सामाजिक कार्यकर्ते नाहीतच. माझी बहीण अशाच एका लहान गावात लायब्ररीयनचे काम करत आहे. मी मनात म्हणत असे M.Sc झालेली माधुरी हे काय काम करते? पण आता मला पण (माधुरीची क्षमा मागून) अमेरिकेत लायब्ररीयनचे काम करायला निश्चित आवडेल (प्रेसिडेंट साहेब ऐकले का? एक लायब्ररीयन तयार आहे. H1B पाठवून ध्या). अर्थात मला शास्त्रोक्त ग्रंथपाल बनावे लागेल हे नक्की. सोबत मी पाहिलेल्या लायब्ररीचा वेब अड्रेस देत आहे. http://www.bernardslibrary.org यात या लायब्ररीचा इतिहास आवर्जून वाचावा. या प्रत्येक संस्थेत एक जाहिरात असते की, Volunteers हवे आहेत. अनेक सिनियर सिटीझन्स आणि तरुण अशा संस्थात स्वयंसेवक म्हणून आनंदाने काम करताना दिसतात. आपला मौल्यवान वेळ समाजासाठी शेअर करताना दिसतात. नासामध्ये पण असे अनेक स्वयंसेवक होते. कोणत्याही संस्थेत गेलात तर Information Counter वर जाण्याआधीच हे स्वयंसेवक आपण तेथे काय बघणार

आहोत ही माहिती शेअर करतात, माहिती पत्रक हातात ठेवतात, आपल्या मनात कोणताच संभ्रम राहणार नाही याची काळजी घेतात आणि हे सर्व सुहास्य वदने !! (सच्चा भारतीय संकोचून गेल्याशिवाय राहत नाही.)

ह्युस्टनमध्ये एका Fine Art Museum मध्ये गेलो. अनेक देशोदेशींची प्राचीन अर्वाचीन पेंटिंग्ज, पुतळे आणि इतर अनेक गोष्टी मांडल्या आहेत. त्यातील अनेक गोष्टी सुंदर होत्या, पण त्यातला प्रत्येक कलाकृतीचा कलास्वाद कसा घ्यायचा हा आमच्या पुढे प्रश्नच होता. एक युरोपियन शैलीतले ८'-१०' उंच पेंटिंग होते. अप्रतिम सौंदर्य असलेले ते पेंटिंग एक शिक्षिका साधारण चवथी-पाचवीच्या १०-१२ मुलांना घेऊन समजावून सांगत होती आणि ती मुले ते मनापासून ऐकत होती. आम्ही ते पाहिले आणि म्हणालो “किती लहान मुलांना ही बाई समजून सांगत आहे, त्यांना या चित्रातले काय कळत असेल?” आणि पुढे गेलो. फिरून अर्ध्या तासाने आलो तरी बाई तिथेच आणि मुले पण तिथेच. आता फरक एव्हडाच होता मुले बाईंना प्रश्न विचारत होती. ती शिक्षिका आणि मुले हे दृश्यच आता जास्त कलात्मक वाटू लागले आणि मुख्य म्हणजे ती शिक्षिका गोरी होती आणि मुले काळी. मुले घडवणे म्हणजे काय ते इथे येऊन बघावे. शिक्षिका आणि बरोबर फक्त ८-१० मुले असे दृश्य मला पुढे अनेक म्युझियममध्ये दिसले. मला वाटते या देशात शिक्षक शिकवत नसावेत तर त्यांचे ज्ञान आणि अनुभव फक्त शेअर करतात आणि शिकण्याचे मुलांवर सोडत असावेत. यातच या देशाचे यश आहे.

हा देश कायम जगाशी अनेक गोष्टी शेअर करत आलाय. मग ते तंत्रज्ञान असो, दूरसंचारसेवा असो, विज्ञान असो, हे शेअरिंग आपल्या गीता/ज्ञानेश्वरीच्या शिकवणुकीच्या जातकुळीतले. आपल्याला गीतेतला “कर्मण्ये........” पाठ असते पण जगाला काय द्यायचे हे कळलेच नाही. आता जगाला केवळ शांतता, अहिंसा या गोष्टी देण्यासाठी पुरेशा नाहीत तर माहिती, ज्ञान, जगणे सुकर करणाऱ्या गोष्टी, आनंद देणाऱ्या गोष्टी (material) जगाला हव्या आहेत. अमेरिका ते देत आहे. गेली कमीत कमीत कमी १५० वर्षे हा देश जगाला देत आलाय मग तो एडिसनचा दिवा

असेल, राईट्स बंधूंनी दिलेले विमान असेल, इलेक्ट्रोनिक्स, इंटरनेट, मोबाइल आणि कितीतरी. खरे म्हणजे अमेरिकेच्या बाबतीत सर्व जगाची अवस्था देता किती घेशील दो कराने अशी झाली आहे. स्टीव्ह जॉब्स म्हणे भारतीय संस्कृतीचा शोध घेण्यासाठी आला होता. “स्व”च्या शोधात हिमालयात पण जाऊन आला. त्याचे भारतात येऊन जाणे हा आपला अभिमान विषय. पण शेवटी त्याच्या लक्षात आले आपल्याकडे देण्यासारखे खूप आहे आणि ते जगाला देण्यातच जास्त आनंद आहे. तो परत अमेरिकेत आला आणि उत्तमोत्तम products साऱ्या जगाशी शेअर केली. मला नाही वाटत भारतातल्या कोणा गुरूने त्याला हे सांगितले असेल. मुळात शेअरिंग अमेरिकेत रक्तातच आहे. गुगल/विकिपेडिआ ज्ञान आणि माहिती जगासाठी शेअर करते आहे (यातला व्यावसायिक हेतू बाजूला ठेऊ.). ज्या ज्या माहितीमुळे/ज्ञानामुळे इतरांचे आणि आपलेदेखील जगणे सुसह्य होईल ती ती माहिती/ज्ञान शेअर केली जाते. अमेरिका सह-जीवन शेअर करणारा देश आहे. अमेरिकेत मी google map चे उपयोग शिकलो. google map हे सर्वसामान्यांसाठी माहिती शेअर करण्याचे उत्तम उदाहरण. google map चे महत्व आणि उपयोग इथेच कळतो.

अमेरिकेच्या शेअरिंग विषयी सांगण्यासारखे बरेच काही आहे. आपल्यासारखे उपद्रव मूल्य वाढवणारे समाजकार्य या लोकांना जमतच नाही असे दिसते. इथे मात्र सर्वजण मनापासून “एकमेका शेअर करू अवघे धरू सुपंथ” या मार्गाने जगताना दिसतात. अगदी बस ड्रायव्हरदेखील त्याच्या बसमध्ये बसताना “hallow” म्हणून हसतमुख स्वागत करतो आणि उतरताना त्याच्या बसमधून प्रवास केल्याबद्दल मनापासून “Thank you” म्हणत आभार मानतो आणि आपल्याबरोबर प्रवासाचा आनंद शेअर करतो. पुण्यातील कंडक्टरचा अनुभव घेतलेल्यांना गहिवरून आल्याशिवाय रहात नाही. कंडक्टरच्या आणि रिक्षावाल्यांच्या उर्मट वर्तणुकीला कंटाळून बस आणि रिक्षा प्रवास करणे कायमचा सोडलेले अनेक पुणेकर पुण्यात राहतात.

# सावलीतले सहप्रवासी

# सुरत्राण मावशी

नातवाचे बारसे केले. मला बोलावले होते. सुशीलाबाई सुनेची हौस करतात. बाळाच्या हातात ५ रुपये ठेवले. सुनेला कापड दिले.

मु.भोर ||श्री|| ता.१२

सौ.यमुस आईचा आ. तुझे पत्र मिळाले. आजच नारायणचे खुशालीचे पत्र आले. त्याने तुलाही पत्र पाठवले असे लिहिले आहे. तो भोरला पुढच्या महिन्यात येणार आहे म्हणतो आहे. मी ठीक आहे उगाच दगदग करण्याची जरुरी नाही असे लिहिले पण ऐकणार नाही येऊन जाईल असे दिसते. तो आला तर त्याच्या बरोबर शिकेकाई पाठवीन. ताईचा बापू पुण्याला गेला होता त्याच्या बरोबर मालतीबाईंना १ किलो पाठवली. यंदापण कोजागोरीला गोंदवल्याला जाईन. गुदस्ता गेले होते, त्या मुसलमानाच्या औषधाने जरा माझ्या दम्याला थोडा उतार पडला होता. यंदा नवरात्रात देवी सप्ताह करीन म्हणते शेवाळीन्बाई मागे लागल्यात. आठ-दहा जणी ऐकायला येतात. गंगामामींना अजिबात ऐकू येत नाही पण पोथी ऐकायला बसतात. बाजाराच्या दिवशी चिंतू आला होता. त्याच्या बायकोची तब्येत आता बरी आहे सांगत होता.कमळाबाईंची विमल आणि जावई इथे आले आहेत. रविवारी दोघांना जेवायला बोलावले होते. जावई बोलके आहेत.

*

*

बापुरावांना आणि मुलांना आ.

कळावे, आई

ता.क. सुशीलाबाईंच्या सुनेला दुसरा मुलगा झाला. घरीच बाळंतीण झाली. वजन ७ पौंड भरले. दोघे सुखरूप आहेत. बाराव्या दिवशी .....

एकदम गमतीशीर सुरवात बघून तुम्हाला गम्मत वाटली असेल. पण पाच पैशांच्या कार्डावर असा पत्र संवाद आई–आजी, आजी–मामा, आजी-मावशी यांच्यात दर १५ दिवसांनी चालू असे. अक्षर बारीक काढून देखील पत्रात जागा पुरत नसे तर उरलेला ताज्या कलमातील उरलेला मजकूर वरच्या “श्री” च्यावर लिहिला जात असे, तर कधीकधी पत्ता लिहायच्या चौकटीत पण जात असे. आजी, आई, मावशी आणि मामा यांची सर्व पत्र अशीच असत, बारीक अक्षर, थोडक्या जागेत भरपूर मजकूर आणि बारकावा या मध्ये कमालीचा साम्य असे. ही पत्र बोलकी असत. असे खुशालीचे पत्र लिहून खुशाली कळवणे नेहमीच चाले. ही खुशाली फक्त आपली नाही तर शेजाऱ्या-पाजाऱ्यांची, आळीची, नातेवायकांची, सगळ्या गावाची कळवली जाई. या सर्वांशी असलेले भावनिक नाते सांभाळले जात असे. कोणत्याही पत्रात खाजगी काहीही नसे त्यामुळे बंदिस्त अंतर्देशीय अथवा पाकीट पाठवण्याचा विचारपण येत नसे, याशिवाय जे काम पाच पैशात होते तिथे १० पैसे कशाला खर्च! असा व्यावहारिक विचार पण होता.

माझ्या आजीने शाळा पाहिलेलीच नव्हती. भोरमध्ये तिला मावशी म्हणत. माहेरी तिचे बारसे केलेले करायचेच राहिले होते, तिच्या जन्मापासूनच मावशी म्हणायला सुरवात झाली. आजोबांचे नाव शंकर त्यामुळे तिचे नाव पार्वती ठेवले पण मावशी हे बिरूद कायमचे चिकटलेले. पुढे सुरत्राणमावशी असे आदरार्थी संबोधन झाले. सुरत्राण हे माझ्या आजोळचे आडनाव. आजोबा शंकरशास्त्री सुरत्राण बनारस, कलकत्ता विद्यापीठातून संस्कृत, आयुर्वेद वगैरे शिकलेले. त्यांनी तिला अक्षर ओळख करून दिली.

आजोबा अकाली गेले तेंव्हा सर्व जण डोंबीवलीत होते. पदरी दोन मुले आणि २ मुली. थोरला मामा १४ वर्षांचा आणि धाकटा ७. मध्ये २ मुली. त्यांनी एक चांगली गोष्ट केली होती म्हणजे, भोरला घर बांधले होते. भोरपासून आजीचे माहेर ५-६ कि.मी. वर . तिने मुलांसकट भोरला स्थायिक होण्याचे ठरवले. माहेरचा आधार म्हणावा नवऱ्यापाठोपाठ लगेचच वडील आणि भाऊ गेले. तिच्याच

मुलांच्या वयाच्या २ भाच्यांची जबाबदारी आली. सासरकडून कोणीच नातेवाईक नव्हते. आधाराला पुरुषमाणूसच उरला नाही. तिनेच पुरुषांसारखी कंबर कसली. मुलांची आई असण्यापेक्षा वडील होणे आवश्यक होते. उदरनिर्वाहासाठी तिने अनेक व्यवसाय केले २ म्हशी पाळल्या दुध विकले. भोरच्या राणी सरकारांकडे दुध देत होती. डाळी भरडून पुण्याला विकल्या. शेतकऱ्यांकडून आंबेमोहर, डाळी, शिकेकाई, घेऊन पुण्याला परिचितांकडे विकले. आजोबांनी दिलेल्या अक्षरओळखीवर भागवत, हरिविजय, रामविजय, पांडवप्रताप इ. पोथ्या वाचन करे. १०-१५ बायका ऐकायला येत. त्यांनी दिलेली दक्षिणा, धान्य, साखर हा पण एक उत्पन्नाचा भाग असे. पोथी चालू असताना बायकांपुढे तांदूळ, डाळ, भाजी, वाती इ. ठेवले जात पोथी होईपर्यंत सर्व काम झालेले असे. पोथी वाचताना निरुपण करण्याची कला पण तिने साध्य केली होती. श्रोत्यात सर्व जातीच्या स्त्रिया असत. पोथी ऐकताना मध्ये परमेश्वराचे नाव आले कि, सर्वजणी हात जोडून कपाळाला लावत. त्यांच्या चेहऱ्यावर भावूक भाव आजही आठवतात. त्यांच्यासाठी मावशींचे काम करणे म्हणजे अभिमानची गोष्ट असे. लोक संग्रह (contacts) मोठा होता. तिच्या शब्दाखातर भोरहून पुण्याला नातेवाईकांकडे २०-२५ किलो तांदूळ पोचवायलादेखील कोणी नाही म्हणत नसे.

दिवस सरले. थोरला मामा मॅट्रिक झाला पुढे शिकता आले नाही. सरकारी नोकरीत लागला. आईपण मॅट्रिक झाली. धाकटा मामा इंजिनिअर झाला. आई व मावशीचे लग्न झाले. दोन्ही मामा नोकरीसाठी बाहेर पडले. ती एकटीच भोरला राहिली. घराच्या मागील बाजूस भाड्याने देता येतील अशा खोल्या बांधल्या स्वत:ची म्हातारपणाची तजवीज केली. स्वभावात कर्तृत्वाने एक प्रकारचा करारीपणा आला होता, कोणाकडे राहायचे नाही असे ठरवले. ६ महिन्यातून ८-१५ दिवस चौघांपैकी एकाकडे आणि नड असेल व बोलावले आले तर, त्या मुलाकडे व मुलीकडे जात असे. बाकी मुक्काम भोरला. वर्षातून ५-६ दिवस सर्वांना भोरला जमवी. तिच्या उत्साहास भरते येई. स्वयंपाकघराचा ताबा तिच्याकडे बाकी सर्व मदतनीस. सकाळी ब्रेकफास्ट म्हणजे कर्दळीच्या पानावर मेतकुट भात

तूप. ओळीने १५-२० जण बसत भाडेकरुंची पण मुले जेवायला आमच्याकडेच असत.

तिचे तिने जग निर्माण केले होते. रस्त्यावरून येणारा जाणारा परिचित २ क्षण दारातच टेके, मावशींशी २-४ सुख-दुःखाच्या गोष्टी बोले, प्रसंगी मावशींचा सल्ला मागे आणि पुढे जाई. भोरला तिचे पोथी वाचन, गावात होणारे निरनिराळे उत्सव, तिच्या मैत्रिणी, तिचा शेजार, भाडेकरू यांच्या रमून जाई. भाडेकरूंना पण प्रेम लावले. कोणाची बायको माहेरी गेली कि ते जेवायला मावशींकडे. नांदेडकर म्हणून एक फोरेस्ट रेंजर अनेक वर्षे भाडेकरी होते, एका खोलीत राहायचे. बायको वारली होती, मुलगा नव्हता. एकटेच होते स्वत: स्वयंपाक करायचे. पण प्रत्येक सणाला आमच्याकडे जेवायला निमंत्रण! “इतर वेळी पुरुषांनी कितीही स्वयंपाक केला तरी सणावाराला बाईचाच स्वयंपाक हवा!” शेवाळीनबाई भांडी घासत त्यांचे स्थान मोलकरणीचे नव्हते तर मैत्री होती. त्यांच्या नवऱ्याने दारू पिऊन गोंधळ केला की, ए विलास जारे जरा मावशींना बोलाव असे म्हणले की, तो गप्प बसे. मावशींचा सर्वांना धाक असे.

मी तिच्याकडे आठवी-नववी मध्ये २ वर्षे राहिलो. तिची माणसं सांभाळण्याची पद्धतच वेगळी होती. “अरे! ही वाटीभर भाजी ताईच्या बापूला पोचवून ये रे, त्याला माझी आळूची भाजी फार आवडते.” प्रत्येक वेळी आळूची भाजी केली कि, बापुमामास जाणारच. ताई म्हणजे तिची आत्या आणि बापू तिचा मुलगा. माणसांचे उल्लेख ताईचा बापू, नेरयाचा चिंतू, कमळाबाईंची विमल, शिन्दाचे अण्णा असा असे. तिच्या सासरच्या एकमेव नातेवाईक म्हणजे गंगामामी (वय ८५). या गंगामामी माझ्या आजोबांच्या मामी. विधवा होत्या. २ मुली सासरी पडल्या होत्या, पण म्हातारीला जावयांकडे राहणे पसंत नव्हते एकटीच स्वत:च्या वाड्यात रहात असे. मामींच्या शेतातला भला मोठा लाल भोपळा सरकती त्यांना आणून देई (खरे म्हणजे सरकत्याकडून बऱ्याचवेळा भोपळाच हाती पडे). तो घेऊन त्या आजीकडे येत. मामींना घारगे फार आवडत. मग आजीला

घारगे करण्याची फरमाईश करत. सांगताना श्रीकांतला आवडतात म्हणून आणला असे सांगत (आणि हे खरेपण होते). आजी माझ्याकडे मिस्कीलपणे बघे, “म्हातारीला घारगे आवडतात पण तुझे नाव घेते” असे मला सुचवे. वयामुळे १/२ घारग्यात मामींचे पोट भरे, तृप्त होत. मग पुढे ४-५ दिवस माझी चंगळ!

अनेकांची ती आश्रयदाती बनली. तिच्या बहिणीचे घर गांधीहत्येत जाळले. बहिण हयात नव्हती, पण तिने जवळ जवळ वर्षभर मेव्हणे आणि तिच्या मुलांना आधार दिला, ते भोरला त्यांचे लागी लागे पर्यंत. गांधीहत्येच्या काळात तिच्या माहेरचे घर जाळणार अशी कुणकुण कुठून तरी लागली. एक पोलिसासारखा खाकी ड्रेस मिळवला. एका तगडा तरूण नातेवायकाला भाच्याच्या दारात काठी घेऊन उभे रहायला सांगितले. कोणी विचारले तर एव्हडेच सागायचे “मामलेदारसाहेब सरकारी कामासाठी गावात येणार आहेत. यांच्या घरी मुक्काम आहे. मी सायबांचा शिपाई आहे.” ते घर वाचलेच, पण कडेची ब्राह्मणांची २-३ घरेपण वाचली. तिच्यात एक समयसूचकता होती. वरचा किस्सा ती फार रंगवून मिस्कीलपणे सांगे. अडी अडचणीला गरीब बायकाच काय पुरुषही मदत मागत. कोणालाही तिने विन्मुख पाठवले नाही.

आजीने जवळ जवळ सर्व नातवांची लग्न पहिली. पतवंडे पहिली. प्रत्येक लग्नात तिचा सहभाग आशीर्वादापुरता नसे, तर सक्रीय असे. तिचे व्यक्तिमत्वच असे होते कि, काहीही करायचे असेल आणि तर तिने शिक्कामोर्तब केले कि करणाऱ्याला आपण करतोय ते योग्य करतोय असे वाटे. मोठ्या मामाला heart attach आला, तेव्हा ती ४ महिने त्याच्याकडे राहिली. त्याची मुलगी गतिमंद आहे तिला ३ वर्षे भोरला सांभाळली. आई नोकरीस असल्याने तिला मधून मधून मदत लागे. या शिवाय शेजारी-पाजारी आदी अडचणीला उभी असेच. अनेक संकटे झेलली जो काही थोडाफार आधार मिळाला तो गोंदवलेकर महाराजांवर असलेल्या श्रद्धेचा. आणि अण्णांचा. अण्णा तिचे देवऋषी होते. अण्णा येसुला (मुलगी) बरं वाटत नाही पत्र आले आहे जरा बघताय का? अण्णा ८-१० रुईचे दाणे पाटावर टाकत आणि थोडा विचार करून तिला सांगत “येसुताईना कळवा ५ शनवार मारुतीला तेल

घाला. अमुशेपासून उतार पडतोय की." तिचा विश्वास असे की अण्णा सांगताहेत म्हणजे येसूला बर वाटणारच. लगेच तिला पत्र लिहून कळवत असे. तिला जाऊन आता २५ वर्षे झाली. आज व्यवसाय करताना जाणवतय कि, ती एक ऑल राउंड manager होती. तिने क्रायसेस मॅनेज केले, तिने कन्सट्रेंडस् मॅनेज केले, तिने प्रोजेक्ट मॅनेज केले, तिने एच.आर. केले, पी.आर. केले, तिचे contacts होते, स्ट्रेसेस मॅनेज केले. तिने रामायण, महाभारत वाचले , श्रद्धा ठेवली गोंदवलेकर महाराजांवर, आचरण श्रीरामासारखे, व व्यवहार मात्र रामदासांच्या दासबोधाप्रमाणे !

# ऋषीतुल्य तरुणी

आज १७ जानेवारी. एक तरुणी वयाची ८४ वर्षे पूर्ण करून ८५व्या वर्षात पदार्पण करीत आहे. नाव आहे मालती जोशी. भोवताली सर्व साधारणपणे ४० ते ६० वयाच्या मुली (शिष्या) असतात. ही तरुणी चाळीशीत थोरल्या मुलीच्या बरोबर एस.एस.सी. पास झाली आणि पन्नासाव्या वर्षी संस्कृत पठण शिकायचे ठरवले. उद्यान प्रसादच्या थत्ते गुरुजींच्या पहिल्या महिला पुरोहित बॅचच्या विद्यार्थिनी. अनेक वर्षं शिकल्यावर वास्तुशांत, लग्न, मुंज, इतर अनेक धार्मिक समारंभात पौरोहित्य केले. साठीनंतर विद्यार्थीनींना संस्कृत पठण व पौरोहित्य शिकवण्यास सुरवात झाली आणि आजही ज्ञानदान चालू आहे. शेकडो विद्यार्थिनी तयार केल्या. श्रीसूक्त, पुरुषसूक्त, अथर्वशीर्ष, विष्णू सहस्रनाम, सप्तशती, ब्रह्मणस्पती, पवमान, रुद्र, पूजा विधी इ. शास्त्रोक्त पद्धतीने शिकतात आणि करून घेतात. मुली या तरुणीस बाई (गुरु) असे संबोधतात.

बाईंना आजही वेगवेगळ्या कुटुंबियांचे संस्कृत पठणाचे आणि पौरोहीत्य कार्यक्रमाचे आमंत्रणं येतात. श्रावण, भाद्रपद, नवरात्र हा काळ फारच बिझी. एकदा आमंत्रण स्वीकारले कि, जे पठण करायचे आहे त्याचे शास्त्रोक्त उच्चारासहित

पाठांतर झाले आहे, अशा १५-२० विद्यार्थीनीना फोन करून यजमानांनी दिलेली वेळ कळवली जाते. विद्यार्थिनीची सोय पाहून १०-१२ जणींची टीम तयार केली जाते. टीम तयार करताना आयत्यावेळी कोणी गळले तर २-३ stand by भिडू ठेवले जातात. कोण कोणाला आपल्या २ व्हीलर वर घेऊन येणार हे ठरवले जाते. यजमान फार दूरचे असतील तर वाहनाची सोय केली जाते. हा सर्व प्लान आमंत्रण आल्यावर २-३ दिवसात केला जातो. कोणतेही आमंत्रण अचानक स्वीकारले जात नाही. कार्यक्रमाचे आदले दिवशी सर्वजणींशी पुन्हा एकदा बोलून खुंटी बळकट केली जाते. एखादी नाही म्हणाली कि, १२वा गड्याला तयार रहायला सांगितले जाते. सर्वजणी कार्यक्रमस्थळी वेळेत पोहोचतील याची दक्षता घेतली जाते. जशी मुलींना वेळेची शिस्त तशीच शिस्त यजमानांना पण ! ते वेळेत तयार नसतील तर त्यांना पण एक हलकी समज देऊन कार्यक्रम सुरु होतो. घरातील सर्वांची त्या आवर्जून ओळख करून घेतात. आधीची ओळख असेल तर एखादी आठवण जागवतात आणि आपुलकीने चौकशी करतात. यजमानांकडून पठणा आधी संकल्प, पूजाविधी शास्त्रोक्त पद्धतीने केले जातात. मग सुरु होते ते पठण. हे सुरेल पठण ऐकणे हा स्वर्गीय आनंद असतो. एका सुरात तास-दीड तास यजमानांचे वास्तूत परमेश्वराचे अधिष्टान जाणवते. एखाद्या शास्त्रीय संगीतासारखे ते सूर त्या ते वातावरण भारून टाकतात. बाई उच्चारांच्या बाबतीत अतिशय काटेकोर, त्यांच्या शिष्यापण तितक्याच तयारीच्या असतात. कोठेही कमी पडत नाहीत. यांची मंत्रपुष्पांजली ऐकणे हा तर एक सुंदर अनुभव असतो. २-३ तासांनी हे पठण संपले कि, आपली समाधी अवस्था संपते. बाई उत्तर पूजा सांगतात आणि कार्यक्रम संपतो. यजमानीणबाई सर्वांसाठी डीश घेऊन येतात. कोणाचा उपवास असेल तर आधीच कल्पना दिलेली असल्याने तिला पण उपवासाची डीश तयार असते. आता कार्यक्रम वेळेत संपल्याने निवांतपणा आलेला असतो. गप्पा रंगतात, पुढे कोणते आमंत्रण असेल तर कोण येणार हे ठरवले जाते आणि सर्वजणी आपापल्या घरी जातात. हे सर्व वाचताना तुमची दमछाक झाली असेल, पण बाई हे सर्व सहजतेने घडवून आणतात. हे घडवून आणण्यात वय आड येत नाही. वर्षभरात साधारण १००-१२५ कार्यक्रम होत असावेत जास्त पण कमी नाही. श्रावण, गणपती,

नवरात्र जवळजवळ दररोज आमंत्रण ठरलेले. टीम मेम्बर्स बदलतात, पण बाई सर्व कार्यक्रमांना असतातच. १० वर्षांपूर्वी बाई आणि टीम युरोप व अमेरकेतील यजमानांसाठी कार्यक्रम करून आल्या. यजमानांचे पूर्ण समाधान होईल याकडे त्यांचे काटेकोरपणे लक्ष असते.

पुण्यात ऐतिहासिक सदाशिवपेठेत घर. पेशवेकालीन नृसिंह मंदिराची मालकी. त्यामुळे येणे जाणे फार. पण बाई कधी कंटाळलेल्या पाहिल्या नाहीत. आमचा जोशी कुटुंबाचा परिचय १९५० सालापासून. माझा थोरला मामा त्यांच्या वाड्यात भाडेकरू. माझ्या आजीशी परशुरामामांचे (नाना) आणि बाईंचे (मामी) सूर जुळले. आर्थिक फरक, देशस्थ/कोकणस्थ आमच्या नात्यात त्यांनी येऊ दिले नाही. आम्ही सर्व त्यांच्या घरचे होऊन गेलो. दोन्ही घरात लग्न कार्यात दोन्ही कुटुंबाची उपस्थिती फक्त नुसत्या अक्षता टाकण्यापुरती कधीच  नव्हती तर लग्न ठरवण्याच्या प्रोसेस पासून ते लग्न पार पडे पर्यंत असे. नृसिंह मंदिरात झालेले एकमेव लग्न म्हणजे माझ्या आई वडिलांचे. माझ्या आईचा उल्लेख बाई ओळख करून देताना बहिण असा देत. भोरसारख्या ग्रामीण भागातून आलेल्या आईला या गोष्टीचे अपार कौतुक. आजही मी गेलो आणि त्यांचे कोणी परिचित असतील तर माझी ओळख हा माझा भाचा अशी बाई करून देतात याचा कारखाना आहे ही माहिती पण त्यांना उगीचच दिली जाते. आपला उर मात्र भरून येतो.  नानांची आणि बाईंची प्रेम करण्याची रीतच न्यारी. नानांविषयी आणि कुटुंबियांविषयी वेगळा ब्लॉग लिहिला जाईल. माझी पत्नी मोहिनी बाईंची विद्यार्थिनी. कॉलेज करून संस्कृत शिकते याचे अपार कौतुक. कोणाचेही कौतुक अपरोक्ष आणि परोक्ष करणे हे नाना आणि बाईंचे वैशिष्ठ्य. हे कौतुक तोंड देखले नसते त्यात जिव्हाळा ठासून भरलेला असतो. घरी गेलो कि, “खूप दिवसांनी आलास?” असा प्रश्न करणार. “नाही नाना आत्ताच तर २ महिन्यांपूर्वी आलो होतो” तर ३ महिन्यांपूर्वी आल्याचा पुरावा देणार, “महिन्यातून एकदातरी येत जा रे” असा प्रेमळ दम देणार. मग बाप्पा (वडील) काय म्हणतात, प्रशांत (भाऊ), माधुरीची (बहिण) चौकशी आमच्या कुटुंबियांची चौकशी. मग बशीत काही तरी खायला आणून देणार. बाई नाती नुसती टिकवत नाहीत तर निर्माण करतात, नात्यांची निगराणी करतात. आजीला जाऊन आता २७ वर्ष

झाली, दोन्ही सख्खे मामापण गेले. पण नातं अव्याहत टिकून आहे. ते मामा-मामी आणि मी भाचा !

८४व्या वर्षी बाई अजून ताठ चालतात. भरपूर उंची, शेलटा बांधा, कोकणस्थी गोरेपण, व्यवस्थित नेसलेली नऊवारी साडी, चेहऱ्यावर सात्विक भाव. सरस्वतीचे रूप त्यांच्यासारखेच असणार अशी खात्री वाटते. घरी स्वयंपाकापासून सर्व गोष्टी स्वत: करतात. नाना (वय ८६) आजही त्यांना मदत करतात. कधीही जा, घर नीटनेटके लावलेले असते. अस्ताव्यस्तपणा अजिबात नाही. मध्ये एकदा गेलो तर स्टुलावर चढून वरच्या फळीवरचा डबा काढत होत्या. त्यांच्या जिव्हाळा लावण्याचा वारसा त्यांच्या पुढच्या पिढीतही पुरेपूर उतरला आहे. केव्हाही मनाला मरगळ आली कि, नानांना आणि बाईंना भेटले कि उर्जा मिळते, प्रसन्न वाटते. ८४ व्या वाढदिवसाची ही सुमनांजली ! त्यांच्या साठी जिवेत शरद: शतम् अशी परमेश्वराशी प्रार्थना !

# मोठ्या दादीजी

वडगाव मावळ येथे माझी आई प्राथमिक शाळेत शिक्षिका. १९६३ ते १९९२ मध्ये निवृत्त होईपर्यंत आम्ही भंडारी यांच्याकडे भाडेकरू म्हणून राहिलो आणि त्याच्या घरातील एक होऊन गेलो. आई शिक्षिका असल्याने मास्तरीणबाई आमच्या घरात राहतात याचा भंडारी कुटुंबियांना अभिमान. आमचा पत्ता कुलकर्णी C/O भंडारी असाच होता. भंडाऱ्यांना आईचे फार कौतुक. एक तर मास्तरीणबाई, दुसरे आम्ही ब्राह्मण, तिसरे आईचे धार्मिक असणे. घराची रचना अशी होती की, आम्हाला बाहेर जायला त्याच्या घरातून जावे लागे. थोडक्यात म्हणजे राहत्या घरचाच काही भाग आम्ही वापरत होतो. रात्री अपरात्री केव्हाही बाहेर जावे लागले तर त्यांना उठवावे लागे पण भंडाऱ्यांनी कधी कंटाळा केला नाही. आणि हे असे १-२ नाही तर २० वर्षे चालले होते. भंडारी म्हणजे महेश्वरी मारवाडी. गावात भरपूर इस्टेट. २०-२२ माणसांचे एकत्र कुटुंब. मोठ्या दादीजी (शिराकुंवरबाई) , वय ८०+ आणि धाकट्या दादीजी (इम्रतीबाई), वय ७५+ अशा दोघी विधवा कुटुंब प्रमुख. दोघींना लहान वयात वैधव्य आलेले. दोघींना मुलबाळं नाही. पुतणे लहानपणीच पोरके झालेले. पुतण्यांचा सांभाळ दोघींनी केला.

आपापल्या नवऱ्याची इस्टेट नावावर, पण कोठे त्याचा तोरा की अवास्तव अभिमान नाही. त्यात पण मोठ्या दादिजींना मान मोठा. त्यांच्या शब्दाबाहेर कोणी नाही. मोठ्या दादीजी गोऱ्या पान, डोळयात सात्विक आणि प्रेमळ भाव. कपाळाला गंध आणि बुक्का लावत. त्यांच्या गोऱ्या कांतीला तो फार सुंदर दिसे. गळयात तुळशीची माळ आणि पांढरी स्वच्छ साडी. दादिजींना घरात सतत काहीना काही तरी धार्मिक कार्यक्रम घडवून आणण्याची हौस. काकड आरती, आवळी भोजन, अन्नकोट, कोकिळा व्रत, रामनवमी, कृष्णाष्टमी, श्रावण, गणपती, दिवाळी अशा अनेक गोष्टी दादीजी उत्साहाने साजऱ्या करत. अन्नकोट पाहण्यास सार गाव लोटे. मोठा दिवाणखाना भरून ५०-६० प्रकारचे पदार्थ ठेवले जात. होळीला दरवर्षी थंडाई करत. थंडाईची त्यांची स्पेशल रेसिपी होती. प्रत्येक कार्यक्रमात सर्व लहान थोरांना त्यात सामावून घेत. भंडारी कुटुंब म्हणजे सदैव उत्साही असे आणि दादीजी या उर्जेचा स्रोत असे. ८४ वयापर्यंत महिन्याच्या दोन्ही एकादशीला देहूला तुकोबाचे दर्शन ठरलेले. रेल्वेने देहूरोड पर्यंत जात पुढे देहुपर्यंत पायी. या शिवाय सदैव दानधर्म चालूच असे. कुत्रांचा(खंडोबा) घास, कावळयाचा (पितर) घास, गायीचा (जगन्माता) घास हे दररोज चालूच होते. गावातील मागेल त्याला रोज ताक फुकट देणे हा त्यांच्या पुण्य कर्माचा मोठा भाग असे.

घरात २ म्हशी आणि २ गायी होत्या. त्यामुळे दुध दुभते खूप. सर्वांना पुरून शिलकीतल्या दुधाचे ताक व्हायचे. ताक करण्यासाठी एक मोठी ५-६ फुट उंचीची रवी भिंतीला लावलेली असे आणि खाली एक मोठा डबा (३ पायलीचा) त्यात ताक घुसळायला ठेवलेले असे. ती रवी एका दोरीच्या सहाय्याने फिरवायची की ताक घुसळले जायचे. एकावेळी २५-३० ली. ताक घुसळले जाई. दररोज सकाळी या ताकाचा सेट अप लावलेला असे. घरातील लहान-मोठ्याचा प्रत्येकाचा हात या ताक करण्यास लागेल यावर दादिजींचा कटाक्ष असे. घरातील सर्वांनाच या पुण्याचा लाभ व्हावा ही दादिजींची इच्छा. त्यामुळे सर्वांनाच येत-जाता ताक घुसळण्याची सवय लागली होती. मी पण त्या वयात हे काम आनंदाने केले आहे. ११ नंतर हे ताक घेण्यास लोक येत. वडगावातील प्रतिष्ठित देखील घरातील लहान मुलाबरोबर अथवा स्वत: भांडे घेऊन ताक नेत. कोणालाही असे करण्यास कमीपणा वाटत नव्हता. ताक झाल्यावर दादिजींची पहली हाक आईला येई.

“मास्तरीणबाई ताक घेऊन जा”. आमच्या घरापासून सुरवात. ताक अतिशय मधुर असे, कधी आंबट ताक मी चाखले नाही. ताक वाटण्याचा पुण्य सोहळा ६० वर्षे दादीजींच्या मृत्यू पर्यंत अखंड चालला होता.

दादीजींना कायम प्रसन्न पाहिले, कधीही आजारी पाहिले नाही, दु:खी पाहिले नाही, कधी कुणाला रागवत नसत. मुलांनी फारच दंगा केला तर “घनो इत्रो हुयो हे!” (फार मस्तीखोर झालाय!) एव्हडेच म्हणत. सदैव कामात व्यग्र असत. ठराविक वेळी डोळे मिटून माळ जपत बसत (मारवाडीत- माळ ओढणे). दिवाळीत सगळया घराला मुलांकडून रंग देऊन घेत. ग्रे रंगाचा त्यांचा एक फॉर्मुला होता. यात नीळ, चुना, गुळ आणि बरच काही असे, पण रंग लावल्यावर भिंतीला टेकल्यास अंगाला कधी लागत नसे. जोधपूरची घरे या रंगात असतात.

सुनांना आणि मुलींना कामाची वाटणी समान केलेली असे. कोणाच्या तक्रारीस वाव नसे. दादीजी इफेक्टिव्ह होम मॅनेजर होत्या. पहाटे पाच वाजता आंघोळ कधी चुकली नाही. मग तुळशीला पाणी आणि सुर्याला अर्घ्य आणि दिवस सुरु, ते रात्री ११ पर्यंत. मरण देवाने बोलावल्या प्रमाणे कोणालाही त्रास नाही, त्यांना स्वत:ला पण नाही.

आजचे स्वार्थी जग बघताना मोठ्या दादीजी किती मोठ्या होत्या हे सारखे जाणवते.

# सुरेश हुंदरे – एक अनुकरणीय आश्चर्य

सुरेश हुंदरे गेले हे कळले. क्षणभर मन सुन्न झाले. सुन्न होणे ही मनाची नैसर्गिक प्रतिक्रिया. पण सुरेश हुंदरे अचानक आपल्यातून जाणे म्हणजे पुढच्या पिढीने ज्या दिव्याकडून प्रकाश मिळवायचा तोच अकाली विझल्यासारखे झाले आहे.

कोण होते सुरेश हुंदरे तर अतिशय मार्मिकपणे सांगता येईल. टी.व्ही वर आबुराव आणि बाबुराव ही बतावणी पात्रे आपल्या वडिलांचे बढाईखोर पराक्रम सांगतात आबुराव म्हणतो माझे वडील एका ढान्गेत अमेरिकेत पाउल ठेवतात तर बाबुराव म्हणतात हे तर काहीच नाही माझे वडील पहिलं पाउल चंद्रावर टाकतात आणि दुसरे मंगळावर. अशाच पद्धतीने मी जर तुम्हाला सांगितले की मी असा एक माणूस पहिला आहे ज्याने आपल्या व्यावसयिक कारकीर्दीत एकही रुपयांची लाच दिली नाही आणि एक रुपयापण काळा (२ नंबर) पैसा केला नाही तर तुम्ही म्हणाल काय राव आबुराव-बाबुरावची नवी गोष्ट सांगताय काय? पण हा माणूस असाच विलक्षण होता आणि हे सत्य होते आणि त्यांच्या ३०—३५ वर्षांच्या

कारकीर्दीत १५० कोटींची उलाढाल, १०० माणसांना रोजगार हे घडले. लाच न देता धंदा काय वेडेबिडे आहात का? लाच देणे हे सत्य आपण किती स्वीकारले आहे की सुरेश हुंदरे हे रम्य कल्पना वाटावेत. सुरेशजींना भेटण्याचे २ प्रसंग मला आले त्यातला दुसरा आधी वर्णन करतो कारण माझ्या आयुष्यातली ती एक अभिमानाची गोष्ट आहे.

आमचे प्रिय शिक्षक कृ. ब. तळवलकर यांच्या नावाने २०११ चा “अनुकरणीय उद्योजक” हा पुरस्कार त्यांना द्यायचे आम्ही ट्रस्टी मंडळींनी ठरवले आणि त्यांची भेट घ्यायची ठरवले. त्यांच्या काही परिचितांनी ते कोणताही पुरस्कार घेत नाहीत आणि त्यांना आवडत नाहीत तेव्हा सांभाळून अशी गर्भित सूचना दिली. म्हटले जायचेच. फोन मिळवला येण्याचे कळवले त्यांनी पण “या भेटू” असा प्रतिसाद दिला. आम्ही चौघे पुण्याहून बेळगावला निघालो. तेथे त्यांचा poly-Hydron नावाने व्यवसाय आहे . सकाळी ११ वाजता त्यांच्या बिझनेस आश्रम अशी पाटी असलेल्या कार्यालयात पोहोचलो. स्वागत झाले. आत गेल्यावर स्वामी विवेकानंदांचा पुतळा, सभोवताली अनेक पुस्तके व्यवस्थित लावून ठेवलेली कपाटे, भरपूर उजेड आणि मधोमध त्यांचे प्रशस्त टेबल. प्रसन्नपणे स्वागत केले. त्यांना अशा येण्याची सवय असावी. कारण अनेक व्यावसायिक आणि व्यापारी संस्था शैक्षणिक संस्था त्यांच्या या बिझिनेस आश्रमास भेट देत असतात. ते स्वत: एक अभ्यास विषय झाले होते. पुरस्काराविषयी एकदम विषय काढायचा नाही असे आमच्यात ठरले होते. त्यामुळे “तुमच्या व्यावसायिक संकल्पना समजून घेण्यास आलो आहोत” एव्हडी सुरवात केली. त्यांनी त्यांचे व्यावसायिक जडण घडण, व्यावसायिक नीतीमूल्यांचे काटेकोर पालन आणि कामगारांचे स्वातंत्र्य यावर अतिशय परखड विचार ऐकवले. त्यांच्या व्यवसायाला नैतिक अधिष्ठान देणारी इन्कम टॅक्स संदर्भात एक घटना पण त्यांनी प्रांजळपणे ऐकवली.

“मी काही धुतल्या तांदुळासारखा नव्हतो पण या घटनेने मला विचार करण्यास प्रवृत्त केले. आणि प्रामाणिकपणे व्यवसाय करावयाचे मी ठरवले. प्रामाणिकपणा मी प्रथम माझ्यावर लादला आणि मग सोनी आणि टोयोटा या

कंपन्यांच्या प्रवर्तकांनी या विचारांना बळ दिले. विवेकानंदांनी मार्ग दाखवला. चला आमचा कारखाना बघूयात." असे म्हणून ते स्वत: आम्हाला घेऊन त्यांचा कारखाना दाखवू लागले. जाता जाता अनेक गोष्टी समजून सांगत.

" मी आमच्या कारखान्यास बिझिनेस आश्रम म्हणतो. येथे प्रत्येकाने आपली व्यावसायिक नीती समजावून घेतली पाहिजे आणि त्याप्रमाणे वर्तन केले पाहिजे यावर आमचा कटाक्ष आहे. आमच्याकडे कोणत्याही कामगारास कंपनीचे बॅलन्सशीट / नफातोटा बघण्याचा अधिकार आहे. प्रत्येक कामगारास मिळणारा इन्सेन्टिव्ह हा त्याने केलेल्या कामावर मिळतो. आमच्याकडे वेगळे क्वालीटी सेक्शन नाही. प्रत्येकाने आपल्या कामाची जबाबदारी घेतली तर या सेक्शनची गरज नाही. गेली अनेक वर्षे आमच्या उत्पादनात १०० टक्के अचूकता आम्ही सातत्याने जोपासली आहे. आमचे कामगार अपवादात्मक परिस्थितीत रजा घेतात. तर येथे सर्वजण समान आहेत माझे कामगार जे जेवतात तेच मी जेवतो. कँटीनमध्ये त्यांच्याबरोबरच जेवण घेतो. माझ्या केबिन मध्ये कोणासही प्रवेश असतो. येथील पुस्तके वाचू शकतो. मला प्रश्न विचारू शकतो. बाहेरील पाहुणे, सरकारी अधिकारी यांचा पण अपवाद नाही. कोणत्याही कस्टमरला फेव्हर करत नाही. आम्ही कोणालाही लाच देत नाही. पूर्वी येणाऱ्या प्रत्येक सरकारी अधिकाऱ्यास आम्ही पैसे देत नाही असे सांगावे लागे. आता परिस्थिती बदलली आहे सरकारी अधिकारी येतात त्यांचे अकौंट तपासणीचे काम करतात त्याचा रिपोर्ट देतात काही त्रूटी आढळल्यास आम्ही त्यावरील दंड भरतो (अशी वेळ बहुदा येतच नाही) पण आम्हाला पैसे मागण्याची हिम्मत होत नाही. त्यांना कोणतीही स्पेशल ट्रीटमेंट दिली जात नाही. त्यांना हवे असणारे रेकॉर्ड दिले जाते. मदतनीस दिला जात नाही. माझे सरकारी काम झाले नाही तर १ महिन्याने आम्ही त्यांना काम न होण्यामागचे कारण लेखी विचारतो. आमच्या मागणीतील त्रूटी सांगा अशी विनंती करतो. तर काही न देता घेता काम होते. या जागेला आम्ही बिझिनेस आश्रम म्हणतो त्यामुळे प्रत्येकजण वस्तूचे पावित्र्य जपण्याचा प्रयत्न करतो. आमचा कामगार आणि स्टाफ यांना मी न सांगता वैयक्तिक जीवनात हीच तत्वे पाळतो हे विशेष. साध्या इथे १०० सीएनसी मशीन आहेत. या कारखान्यातील प्रत्येक मशीन बँकेचे कर्ज न घेता आणलेले आहेत. आम्हास आत्ता पण एक रुपयांचे कर्ज नाही. आम्ही सर्वांसाठी हे ध्यानमंदिर उभे केले आहे. मी स्वत: पहाटे ५ वाजता येथे ध्यान

करतो. कोणासही काम करताना ताण आला तर येथे येऊन ध्यान करण्याची मुभा आहे परवानगीची गरज नाही. मन शांत झाले की कामगार परत उत्साहाने कामास लागतात. ”

“आमच्याकडे ओव्हर टाईमची जरुरी नाही. वेळेत येणे जसे बंधनकारक आहे तसेच घरी जाणे. मी स्वत: हे कटाक्षाने पाळतो. मी इथून बाहेर गेलो की एकल स्कूल चे काम करतो. या संस्थेचे कर्नाटक विभागाचे कार्य मी बघतो. अनेक गरीब आणि वंचित मुलामुलींना या संस्थेतर्फे शिक्षण दिले जाते यासाठी सरकारी मदत घेतली जात नाही. सर्व काम स्वयंसेवक करतात. पहिली ते सातवीचे मोफत शिक्षण दिले जाते. प्रत्येक माणसाने आपला वेळ समाजासाठी दिला पाहिजे.”

सर्व कारखाना दाखवून झाला. जेवणाची वेळ झाली. कँटीनमध्ये सर्वांच्या बरोबर त्यांनी जेवण घेतले. आता त्यांच्या कार्यालयात बसलो. जे पाहिले ते अद्‌भूत होते.

आता विचारण्याची वेळ आली होती.

मी सरळ विचारले “आता आमच्या येण्याचा उद्देश सांगतो आम्ही आमच्या शिक्षकांच्या नावाने देण्यात येणारा “अनुकरणीय उद्योजक” पुरस्कार आपल्याला देण्याचे ठरवले आहे. तुमची सम्मती हवी आहे.” ते क्षणभर विचारात पडले.

“ मी पुरस्कार घेत नसतो हो! ”

“ आमच्या सरांची तत्वे जगणारी माणसे आम्ही शोधतो आणि पुरस्कार देणे हे गौण आहे. पण तुमच्या सारखी अनुकरणीय उदाहरणे लोकांपुढे आली पाहिजेत. विचार कराच, नव्हे हो म्हणाच” मी.

त्यांनी ३-४ मिनिटे विचार केला आणि एकदम विचारले

“पुरस्कार कोणाच्या हस्ते देणार”...सुरेशजी

“ग्राहक पंचायतीचे बिंदुमाधव जोशी”...मी

“राजकारणातले कोणी नाही ना?”... सुरेशजी

“छे, आमच्या ट्रस्टमध्ये राजकारणातले कोणीही नाही सरांचे विद्यार्थी आणि कुटुंबीय”...मी

“मग माझा होकार आहे”

आम्ही अवाक झालो. आनंद झाला.

पुढे फेब्रुवारी २०११ मध्ये पुरस्कार वितरण सोहळा झाला. सुरेशजींनी जे मनोगत केले ते व्यावसायिकांसाठी वस्तुपाठच होता. त्यांना दिलेल्या पुरस्काराने कार्यक्रमास वेगळीच उंची मिळाली. या वर्षात देशात सर्वत्र अण्णा हजारेंचे भ्रष्टाचार विरोधी आंदोलन चालले होते. त्यामुळे सुरेशजींच्या विचारांनी उपस्थित भारावून गेले.

पुरस्काराची रक्कम त्यांनी एका एकल शाळेस दिली. त्या देणगीस स्वत:चे नाव न देता आमच्या सरांचे नाव दिले केव्हडा मोठेपणा ! तशी रीतसर पावती पाठवली आणि पुढे या शाळेची प्रगती आम्हास कळवत.

एक व्यावसयिक आश्चर्य ठरलेले सुरेश हुंदरे हे पुढच्या पिढीस दीपस्तंभ ठरावेत. He was inspiring wonder.

# अण्णा तळवलकर

१९७६ साली एफ. वाय. सायन्स फर्स्ट क्लास पास झालो. पण माझा इंजिनिअरींगचा प्रवेश ३ मार्कांनी हुकला आणि खूप नर्व्हस होऊन बसलो. बीएससी व्हायचे नव्हते आता काय? असा प्रश्न निर्माण झाला. कोणीतरी सांगितले की, कुस्रो वाडिया कॉलेजमध्ये इलेक्ट्रोनिक्स आणि रेडिओ इंजिनीअरींग नावाचा डिप्लोमा कोर्स आहे आणि एफ.वाय. सायन्सनंतर असल्याने वर्षे वाया जाणार नाही. थोडासा खट्टू होऊनच फॉर्म भरला आणि प्रवेश पण मिळाला. पहिल्याच दिवशी कॉलेज मध्ये गेलो वर्गात ३० मुले होती सर्वच जण समदु:खी होती. इंजिनिअरींगचा प्रवेश थोडक्यात हुकलेले. वर्गात पहिल्या पिरियडला एक साधारण उंचीचे, गोरेपान आणि पूर्ण टक्कल असलेले शिक्षक आले. पांढरा शर्ट, काळी पँट, सोनेरी काड्यांचा चष्मा पायात व्यवस्थित पॉलिश केलेले बूट, रुबाबदार आणि करारी चेहरा. हे रूप पाहूनच विद्यार्थी शांत झाले. पिन ड्रॉप सायलेन्स झाला. या व्यक्तीला कोठेतरी पहिले आहे असे जाणवले मग लक्षात आले फोटोत अनेक वेळा पाहिलेले शंतनुराव किर्लोस्कर साधारण असेच दिसतात. या पहिल्या दर्शनानेच या व्यक्तीविषयी

आदरयुक्त दरारा निर्माण झाला तो आजतागायत चाळीस वर्षांनी देखील सरांच्या पश्चात अजून आहे. आज सरांना जाऊन ३३ वर्षे झाली.

पहिल्याच दिवशी "मला वर्गात गोंधळ चालणार नाही. या वर्गात १५ बाके आहेत कोणत्याही प्रत्येक तासास वर्गात प्रत्येक बाकावर दोनच मुले असली पाहिजेत, कोणताही बाक मोकळा अथवा एकच विद्यार्थी असलेला मला चालणार नाही. मला ३० पेक्षा कमी आणि ३० पेक्षा जास्त मुलांना शिकवता येत नाही. मी फक्त ३० मुलांना शिकवू शकतो." असे बजावून शिस्तीचा दंडक पहिल्याच दिवशी बजावला आणि वर्गातील आपला शेजारी अथवा वर्गमित्राला आणण्याची सामुहिक जबाबदारीची जाणीव करून दिली. पहिल्याच तासाला इलेक्ट्रॉनिक्स विषय कसा अवघड आहे, त्याचा अभ्यास करताना एकाग्रतेची कशी गरज आहे आणि तुमचा स्वभाव कसा का असेना, मी तुमच्यात मला हवा तसा बदल घडवून आणणार आहे. दोन वर्षांनी येथून जाताना तळवलकरांचा विद्यार्थी म्हणून बाहेरच्या जगात जाणार आहात हे लक्षात ठेवा. पहिला तास संपला तरी कोणी कोणाशी बोलेना. आयष्यात काहीतरी वेगळे व्यक्तिमत्व भेटले आहे आणि इथून पुढची २ वर्षे वेगळे आयुष्य आहे याची जाणीव सर्वांना झाली. पुढच्या इतर तासांना इतर विषयाचे शिक्षक आले पण वर्ग मुकाट्याने ऐकून घेत होता. जे पहिल्या दिवशी घडले तेच पुढील दोन वर्षे घडत गेले.

सर वर्गात पूर्ण तयारीनिशी येत. जे शिकवायचे ते त्याच्या नोट्स एका पोस्टकार्ड साईझच्या कागदावर लिहून आणत हा कागद टाकावू कागदातून व्यवस्थित एका साईझ मध्ये कापलेला असे. त्या कागदावर अगदी बारीक अक्षरात स्वहस्ते त्यावर जे शिकवायचे त्या टॉपिकचे पॉइंटस काढलेले असत आणि आकृत्या रेखाटलेल्या असत. पहिली ५-७ मिनिटे फळ्यावर विषयाची संदर्भ आकृती काढत. आकृती काढताना ते काहीही बोलत नसत अर्थात सरांची पाठ आहे म्हणून, आम्हीपण बोलण्याची हिम्मत करत नव्हतो. सरांनी काढलेली आकृती जशीच्या तशी वहीत उतरवणे चालू असे. आकृती काढून झाली की, पुढची २ मिनिटे प्रत्येकाच्या जवळ जाऊन आम्ही नीट उतरवतो आहे बघत. एखादा चुकला तर न बोलता वहीतल्या चुकीवर फक्त बोट ठेवत. पुढे विषय सुरु. विषय अर्थात

इलेक्ट्रोनिक्स असल्याने, एकदा इलेक्ट्रॉन दाखवलेल्या सर्किट मधून कसा आणि का फिरतो याचे ॲनिमेशन फळयावरच्या आकृतीवर हाताने दाखवत. विषय शिकवण्याचा हातखंडा इतका की, विषय कोणाला कळला नाही असे सहसा होतच नसे. विषयातील अनेक संकल्पना ते व्यावहारिक दाखले देऊन शिकवत असल्याने विषय वर्गातच पक्का होत असे. घरी अभ्यास करण्याचे फारशी गरज नसे. सर विषयाची नुसती आवड निर्माण करत नसत तर उत्सुकता निर्माण करत आणि इलेक्ट्रॉनिक्स संबधित निरनिराळे प्रयोग करण्यास उद्युक्त करत. सर जी शिस्त पहिल्या दिवशी लावत त्याचा फायदा इतर शिक्षकांना आपोआपच मिळे त्यांच्या तासाला ही मुले मुकाट्याने लक्ष देत. अर्थात इतर शिक्षकांनापण सरांच्या संहितेचा दंडक असेच. दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीत कॉलेजमध्ये प्रोजेक्ट करणे अनिवार्य असे. पण मजा असे.

अण्णांचे स्वत:चे सर्व काही आखीव रेखीव आणि शिस्तीत असे. त्यांचे टेबल, पुस्तकांचे कपाट, खुर्ची कधीही अस्ताव्यस्त असलेले पहिले नाही. आमच्या विभागाची प्रयोगशाळा एक उत्तम प्रयोगशाळा कशी असावी याचा नमुना होती. तेथील स्वच्छता, मांडणी पाहिली की इथे गैरशिस्तीने वागावे असे कोणाच्या मनातही येत नसे. काम करताना आपल्या हातून इथले काही विस्कटले तर गेले नाही ना? असा प्रश्न प्रत्येकाला पडलाच पाहिजे आणि त्यामुळे प्रत्येकजण काळजी घेऊनच काम करे. सरांचा मानसशास्त्राचा अभ्यास असावा. प्रयोगशाळेच्या व्यवस्थित मांडणीतून तिथली शिस्त पाळण्याचे बंधन मुलांवर आपोआप येत असे. १९५० च्या दशकात इलेक्ट्रॉनिक्स या विषयात देशात फार तज्ञ मंडळी नव्हती. साधने अपुरी होती. त्या काळात दुसऱ्या महायुद्धातील इलेक्ट्रोनिक्सचे टाकावू भंगार घेऊन त्यातील उपयुक्त गोष्टी बाजूला काढून त्या वापरून सरांनी स्वत: प्रयोगशाळा उभी केली होती. यातील अनेक प्रयोग त्यांनी स्वत: किंवा मुलांकडून बांधून घेतले होते. प्रयोगशाळेत ज्या वस्तू वापरण्यायोग्य नव्हत्या त्यांचे कायमस्वरूपी प्रदर्शन केले. मुलांच्या समोर कायम या वस्तू दिसल्या पाहिजेत हा त्यांचा कटाक्ष होता. या प्रयोगशाळेचे काही नियम होते. या नियमांची जाणीव पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना दिली जाई. उदा. हातात घड्याळ,बोटात अंगठी किंवा गळयात चेन नको. कारण प्रयोग करताना त्यातील धातु जर सर्किटमध्ये

अडकला तर शॉक बसू शकतो. सुरक्षेचा विचार पहिला. विद्यार्थ्यांना प्रयोगाच्या टेबलापाशी कमरेचा बेल्ट घालण्यास बंदी होती कारण तो बेल्ट बरोबर टेबलाच्या उंचीपर्यंत येतो आणि टेबलाचे पॉलिश खराब होते. भिंतीवरच्या शोकेस मध्ये विद्यार्थ्यांसाठी काही नोट्स लावलेल्या असत. मुलांनी त्या नोट्स उतरवताना भिंतीवर हात ठेवला तर घामाचा डाग दगडी भांतीवर पडतो आणि दगडी भिंतीचे सौंदर्य कमी होते, म्हणून लिहिण्यासाठी stand ठेवलेले असत तेच वापरण्याचा दंडक असे. वर्गात आणि प्रयोगशाळेत रेनकोट आणि छत्री ठेवण्यास स्वतंत्र ट्रे असे. असा ट्रे मी आजतागायत कोठे ही बघितला नाही. प्रयोगशाळेतील शिपाईदेखील त्यांनी त्यांना हवे तसे घडवले होते. हे दोन शिपाईदेखील आम्हा विद्यार्थ्यांचा आदर्श बनून गेले होते. त्यांचा वक्तशीरपणा, टापटीप, शिस्त इतकी होती की, रिझल्ट लागल्यावर कितीतरी विद्यार्थी त्यांच्या आवडत्या दत्तू शिपायाच्या पाया पडून आशीर्वाद घेत.

पहिल्या वर्षी तळवलकरसरांना आम्ही केबीटी असे संबोधत असू. कारण वेळापत्रकावर असे शोर्टफॉर्म लिहिलेले असत. हे संबोधन दुसऱ्या वर्षी बदलले आणि ते अण्णा झाले. अण्णा हे त्यांचे घरगुती नाव. पहिल्या वर्षीचे केबीटी सर् आणि दुसऱ्या वर्षीचे अण्णा हा पण एक जाणवण्यासारखा बदल असे. पहिल्या वर्षात विद्यार्थ्याकडे विद्यार्थी म्हणून बघणारे अण्णा दुसऱ्या वर्षात त्यांचे मित्र होत. अर्थात मर्यादा बाळगून. महत्वाचा बदल म्हणजे शनिवारचा तास. कुस्रो वाडिया कॉलेजला शनिवार रविवार सुट्टी असे. पण आम्हाला प्रत्येक शनिवारी ९ ते १२.३० बोलावले जाई. हा तास इलेक्ट्रोनिक्सचा नसे तर तत्त्वज्ञानाचा असे. हा तास म्हणजे एक वैचारिक मेजवानी असे. यात सर विद्यार्थ्यातला माणूस घडवत ज्ञानेश्वरांपासून ते काफ्का पर्यंत कबीरा पासून ते रजनीशांपर्यंत सर्वांच्या तत्वांची ओळख करून देत. गीता, कुराण आणि धर्मग्रंथ काय शिकवतात? तर ते नेहमी म्हणत तुम्ही अलुफ राहण्यास शिका. “अलुफ” हा त्यांचा आवडता शब्द. म्हणजे तुमच्या जीवनातल्या सुख-दु:खांकडे अलिप्ततेने बघण्यास शिका कशातही गुंतू नका पण कर्तव्य चकवू नका. प्रेमही कर्तव्य भावनेतून करा आणि कर्तव्यपण प्रेमाने करा. इथे अण्णांचे इतर शिक्षकांपेक्षा असलेले वेगळेपण लक्षात येई. ते पाट्या-टाकू शिक्षक नव्हते तर गुरुकुलातील शिक्षक होते. विद्यार्थ्याला इलेक्ट्रोनिक्स

विषयातला तज्ञ बनवायचा होताच, पण माणूस म्हणून घडवण्याचा त्यांचा ध्यास होता. त्यांचा वैज्ञानिक दृष्टीकोनावर विश्वास होता. ते नेहमी म्हणत "मी जे इलेक्ट्रोनिक्स शिकवतो आहे ते उद्या नसेल. ते बदलणार आहे. तुम्हाला हा बदलाबरोबर तुम्ही बदललात तरच तुम्ही उत्तम जगू शकाल." सर द्रष्टे होते त्यांनी शिकवलेले इलेक्ट्रॉनिक्स आज किती बदलले आहे याचे आम्ही साक्षीदार आहोत.

अण्णा स्वत: एक Brand होते. अण्णांचे विद्यार्थी या एका क्वालिफिकेशन वर विद्यार्थी फिलिप्स, टीआयएफआर, सेमीकंडक्टर अशा संस्थांमध्ये नोकरी लागत. DERE या पदविकेपेक्षा अण्णांचे विद्यार्थी हे क्वालिफिकेशन महत्वाचे ठरे. हाडाचे शिक्षक असलेल्या अण्णांचे अनेक पैलू होते. ते उत्तम चित्रकार होते रविवारी कात्रज, सिंहगड अशा ठिकाणी ते त्यांचे रंग साहित्य घेऊन निसर्ग चित्र काढणे हा त्यांचा आवडता छंद. बरोबर १-२ विद्यार्थ्यांना घेऊन जात. चित्रकलेचे संस्कार जाताजाता करत. स्वत: काढलेली चित्रे विद्यार्थ्यांना भेट देत. अण्णा पट्टीचे पोहणारे होते. ते पोहताना पाण्याचा एक थेंब उडत नसे. त्यांना लयीत पोहताना पाहणे एक अविस्मरणीय आनंद असे. अण्णा योगाचे अभ्यासक होते. सहज समाधी अवस्थेत गेलेले त्यांना अनेकांनी पहिले आहे. लोणावळयाच्या कैवल्यधाम मध्ये ते अनेक वेळा जात. समाधी अवस्थेतील मेंदूच्या अवस्थेचा अभ्यास करण्यासाठी त्यांनी एक इलेक्ट्रॉनिक यंत्र संस्थेस बनवून दिले होते. ते उत्तम शिकारी होते. कानाची ऐकण्याचे क्षमता मोजण्याचे यंत्र त्यांनी १९५२ मध्ये शोधले त्याविषयीची बातमी त्यावेळच्या "दै. सकाळ" मध्ये आली होती.

त्याचे पुनर्मुद्रण २००५ साली सकाळ मध्ये झाले आणि या एका छोट्या गोष्टीतून आम्ही विद्यार्थी आणि सरांचे कुटुंबीय यांनी एक ट्रस्ट स्थापन केला. ही घटना त्यांच्या मृत्यूनंतर २५ वर्षांनी घडली. या ट्रस्टच्या माध्यमांतून दर वर्षी "समाज शिक्षक, अवनिमित्र, सेवाव्रती आणि अनुकरणीय उद्योजक" अशी चार पारितोषिके दिली जातात. या निमित्ताने सरांचे वेगवेगळया वयाचे विद्यार्थी एकत्र जमतात. अण्णांचे कुटुंबीयांवर पण अतिशय प्रेम. वडिलांच्या अकाली मृत्यूपश्चात ३ बहिणी आणि २ भाऊ यांचे शिक्षण आणि विवाह केले स्वत: अविवाहित राहिले. अमेरिकास्थित सरांचे धाकटे बंधू डॉ. अरुण तळवलकर यांचे मोलाचे अर्थ सहाय्य

या ट्रस्टला लाभले आहे. अण्णांचे नाव समाजात चांगले काम करणाऱ्या व्यक्तींबरोबर जोडणे एव्हढाच हेतू.

अण्णा इलेक्ट्रॉनिक्स या एका विषयापुरते सीमित असे शिक्षक नव्हते तर एक परिपूर्ण गुरु (Mr.Perfectionist) होते. अण्णाचे कोणत्याही पिढीचे विद्यार्थी आज भेटले तर सरांविषयी कृतज्ञता दाखवल्याशिवाय रहात नाहीत. आपल्याला घडवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे हे मोकळेपणाने मान्य करतात. एक आदर्श शिक्षक कसा असावा याचे अण्णा म्हणजे उत्तम उदाहरण होते. त्यांच्या सावलीतले काही क्षण बऱ्याच विद्यार्थ्यांचे जीवन घडवून गेले, त्यातलाच मी एक भाग्यवान.

## ई साहित्य प्रतिष्ठान

# बारा लाख मराठी वाचकांसाठी ई चळवळ

मराठी ही २३०० वर्षं जुनी भाषा आहे. मराठीत तुकोबा ज्ञानेश्वरांसारखे महान संतकवी होऊन गेले. पुलं , जीएं सारखे महान लेखक गेल्या शतकात होऊन गेले. या साऱ्यांबद्दल बोलताना लोक "न भूतो न भविष्यती" असे म्हणतात. म्हणजे "असे लेखक पुन्हा होणारच नाहीत" असे लोकांना वाटते. पण आम्हाला हे पटत नाही. ज्ञानोबा तुकारामासारखे संत सहस्रकांतून होतात हे खरे. पण मराठीतली प्रतिभा आता आटली आणि यापुढे असे महान लेखक जन्माला येणारच नाहीत हे मात्र खरे नाही. आमचा विश्वास आहे की मराठीत आताही कुठे कुठे महान प्रतिभा जन्माला येत असेल आणि लोकाश्रयाच्या अभावी कोमेजूनही जात असेल.

संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत "गाभवन" ही कल्पना मांडली आहे. आपल्या घरातले वाल, वाटाणे, चवळी असे दाणे असतात ना! त्यांच्या आत एक छोट्टुशी पानांची जोडी असते. हे वाल, वाटाणे, चवळी जर मातीत रुजवली तर त्यातून एक मोड बाहेर पडतो आणि त्याचं मूळ होतं. आणि ही जी छोट्टुशी पानं असतात त्यांच्यातून बनतो वेल किंवा वृक्ष. आणि या वेलीला पुन्हा शेंगा येतात. आणि त्यातून पुन्हा हजारो दाणे. आणि त्यात पुन्हा गाभवनं. म्हणून ज्ञानोबा म्हणतात कि या एका एका दाण्यात एक एक वन उभं राहिल अशी क्षमता असते. पण हा दाणा आपण शिजवून खाल्ला की मात्र संपलं.

मानवी प्रतिभेचेही अगदी असेच होते. मराठी भाषेत किती तरी साहित्याच्या बागा उभारू शकतील अशा क्षमतेच्या प्रतिभावान व्यक्ती जन्माला येत असतात. पण त्यांना योग्यवेळी माती पाणी मिळत नाही. आणि त्यांच्या या साहित्याचा आनंद लोकांपर्यंत कधीच पोहोचत नाही. असे कितीतरी महान लेखक आयुष्यभर पोटापाण्याच्या मागे धावत संपून जातात. प्रकाशात येतच नाहीत.

दुसरीकडे असे लाखो वाचक असतात. ज्यांना काही नवीन छान साहित्य वाचायची इच्छा असते. पण त्यांना पुस्तकं मिळत नाहीत. परवडत नाहीत. कोणती घ्यावीत आणि वाचावीत ते कळत नाही. त्यांची वाचनाची भूक तशीच रहाते. रोजच्या वर्तमानपत्रापलिकडे काही वाचतच नाहीत.

म्हणून ई साहित्य प्रतिष्ठान हे व्यासपीठ नवीन साहित्यिकांसाठी आणि वाचकांसाठी ई पुस्तकांचे दालन घेऊन उभे ठाकले आहे. लाखो वाचकांपर्यंत ही पुस्तके विनामूल्य वितरीत करायला सुरूवात केली आहे. चार वर्षांपुर्वी स्थापन झालेल्या ई साहित्य प्रतिष्ठानने आजवर आपल्या वाचकांना तिनशेहून अधिक, दर्जेदार, मराठी ई पुस्तके विनामूल्य दिली आहेत. सुमारे चारशे नवीन साहित्यिकांना या व्यासपीठावरून सादर केले. इंटरनेटवर मराठी भाषेतील साहित्य लोकप्रिय करण्याची चळवळ हिरिरीने पुढे नेली. कविता, कथा कादंबऱ्या आणि गंभीर विषयांवरची पुस्तके प्रकाशित केली. दोन लाख रसिकांपर्यंत हे दर्जेदार साहित्य विनामूल्य पोचवले. तिनशे गुणिले दोन लाख म्हणजे सहा कोटी पुस्तके ई साहित्य प्रतिष्ठान तर्फ़े वितरित झाली. तसे पाहिले तर हे एक भव्य काम सुरू आहे. नव्या प्रतिभा, नवे लेखक, नवीन निर्मिती. मराठीत एक नवा अध्याय लिहिला जात आहे.

हे काम आम्ही सातत्याने चालू ठेवूच. आम्हाला हा उत्साह आणि प्रेरणा देणारी आपली पत्रेही येत राहू द्या. पण मनात एक विचार येतो. आपली वाचकसंख्या फ़क्त लाख दोन लाख लोकांपर्यंत मर्यादित का? १२ कोटी मराठी माणसांपैकी निदान एक टक्का म्हणजे १२ लाख वाचकांपर्यंत तरी हे विनामूल्य ई साहित्य पोचलंच पाहिजे असं नाही का वाटत आपल्याला? आता इंटरनेट आणि मोबाईल यांचा प्रसार होतो आहे. त्यासाठी आपल्या मदतीची गरज आहे बंधो. आपल्या ओळखीच्या बारा लोकांची, फ़क्त बारा मराठी लोकांची मेल आय डी द्याल? जास्त दिलीत तरी हरकत नाही. पण निदान १२ मित्र किंवा नातेवाईकांची मेल आय डी पाठवा. असे लोक ज्यांनी मराठी साहित्य वाचावे अशी आपली इच्छा आहे. मराठी माणूस एकवेळ पैशांनी गरीब असेल, पण मित्रांच्या बाबतीत श्रीमंत असतो. एक

लाख लोकांनी जर प्रत्येकी बारा आय डी पाठवले तर लाखाचे बारा लाख व्हायला कितीसा वेळ लागणार?

बारा लोकांची मेल आयडी पाठवणाऱ्या वाचकांना आम्ही ई साहित्य VIP Member म्हणून वेगळे मानाचे स्थान देऊ. तुम्हाला आमच्या पुढील प्रवासाची कल्पना देत राहू. तुमच्या सूचना मागवू. तुमच्याकडून मार्गदर्शन घेत राहू. आमच्या पुढील प्रवासाचे तुम्ही सहप्रवासी असाल.

तर होणार ना ई साहित्यचे VIP Member?

आपल्या खास 12 मराठी मित्र नातेवाईकांच्या बारा मेल आय डी esahity@gmail.com वर पाठवा.

खात्री बाळगा, या मेल्सचा कोणत्याही तऱ्हेने गैरवापर केला जाणार नाही. त्यांना जाहिराती किंवा फ़ालतू मेल पाठवून त्रास देणार नाही. यांचा उपयोग केवळ चांगले दर्जेदार मराठी साहित्य पाठवण्यासाठी केला जाईल.

आपले विश्वासू

टीम ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com